
# घोकंपट्टी

**(दोन अंकी नाटक)**

**चं.प्र.देशपांडे**



# घोकंपट्टी

**(दोन अंकी नाटक)**

**-- चं.प्र.देशपांडे**

**अंक पहिला**

( गिरीश आणि मंगेश, दोघेही ६३, दोघेही निवृत्त प्राध्यापक – वेगवेगळ्या विषयांचे -- एका फ्लॅटमध्ये एकत्र राहात आहेत. दोघांच्याही पत्नी वारलेल्या असून दोघांनाही असणारा एकेक विवाहित मुलगा अमेरिकेत आहे. दोघेही दोन लहान गावांतल्या कॉलेजांत प्राध्यापकी करून निवृत्त झाल्यावर या फ्लॅटमध्ये एकत्र राहात आहेत. आधीपासूनच त्यांच्यांत असलेल्या मैत्रीमुळे हे घडलेले आहे. फ्लॅटचा मालक मंगेश आहे. गिरीश मैत्रीखात्यात त्याच्याबरोबर आहे. मंगेश जरा हायस्ट्रंग असून गिरीश त्या मानाने बौध्दिक अंगाने जाणारा, थोडा व्यवहारी टाईप आहे. पण नाटकात, पुढे यांत काही बदलही घडतात.

पडदा उघडण्यापूर्वी टीव्हीवरील बातम्यांमध्ये -- ‘‘ आज सर्वाणी केसमध्ये पुढील सुनावणी झाली – एका मोठ्या सी इ ओ ची ही केस असल्याने या केसकडे पूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे. स्वत:च्या बचावात बोलताना सर्वाणी म्हणाले की त्या वेळी त्यांचे ईमेल अकौंटस आणि कॉम्प्यूटर्स हॅक झालेले होते. कोर्टात त्यांच्या विरोधातले पुरावे म्हणून सादर झालेले ईमेल्स हे त्यांच्या खात्यांतून त्यांच्या नावे दुसऱ्याच कुणीतरी पाठवलेले आहेत. त्या तक्रारदार महिलेला ते ईमेल्स त्यांनी कधीच पाठवलेले नव्हते. याउलट, त्या तक्रारदार महिलेबरोबर खरोखरच देव-घेव झालेले ईमेल्स कोर्टात सादर करून ते म्हणाले की यांमध्ये दुतर्फी आपुलकी, आकर्षण आणि मोकळेपणाच दिसून येतो. ‘‘ इथे पडदा उघडतो. गिरीश अत्यंत लक्षपूर्वक टीव्ही पाहात बसलेला आहे. रात्री नऊनंतरची वेळ. टीव्हीवरचा वरील मजकूर पुन्हा रिपीट होतो.

-- इथे मंगेश प्रवेश करतो. गिरीश तत्क्षणी टीव्ही बंद करतो. स्वस्थ बसून राहतो. मंगेशच्या हालचाली न्याहाळत राहतो. मंगेश काहीतरी शोधतो आहे. एका ठिकाणी त्याला हवे ते कागद सापडतात. तो ते त्याच्या पिशवीत ठेवतो आणि पिशवी योग्य ठिकाणी ठेवतो. आत जातो. काही क्षणांनी बाहेर येतो. बसतो. दोन क्षण. )

गिरीश - सांगू का आता?
मंगेश : ब्रेकिंग न्यूज !
गिरीश : नाही, बडी खबर ?
मंगेश : तेच ते ! नको !
गिरीश : अरे पण --
मंगेश : मला सारख्या असल्या बातम्यांनी घुसमटायला होतं !

गिरीश : त्या सांगू न देण्यानं मला घुसमटायला होतं ना पण !

मंगेश : आपण त्यातल्या त्यात आनंदानं जगतोय हीच खरं तर रोजची बडी खबर हवी !

गिरीश : असे तर खूप असतात.

मंगेश : त्यांच्या हव्यात बातम्या !

गिरीश : ’ त्यांना ’ हव्यात बातम्या !

मंगेश : तुझा विषय मराठी होता म्हणून भाषिक हुशारी नकोय !

गिरीश : पण एवढी चीड कसली येते तुला?

मंगेश : एकूणच स्वभावात न बसणारे काही घडणे म्हणजे नॉर्मल्सी जाणे -- असे खूप असते -- नॉर्मल्सी नसलेले ! त्यालाच असं महत्त्व देत बसायचं नाही !

गिरीश : हे बरंय ! नॉर्मल्सी गेल्यावर तर बातमी होते !

मंगेश पुन्हा हुशारी !

गिरीश : तू सत्याला हुशारी म्हणून हिणवतोयस !

मंगेश : तसं समज ! आय ॲम नॉट इंटरेस्टेड !

गिरीश : मी तर चातकासारखा वाट पाहात असतो रोज बडी खबर सुरू होण्याची !

मंगेश : माहिती आहे ! पण मला त्रास नकोय ! ( गिरीश अस्वस्थ. दोन क्षण. )

गिरीश : सांगू कुणाला मग ? त्याच्यावर विचारविनिमय कुणाशी करू ?

मंगेश : एकमेकांचा छळ करायचा नाही हे ठरवूनच आपण एकत्र राह्यचं ठरवलंय !

गिरीश : सगळ्या ब्रेकिंग न्यूज दडपून टाकण्यात माझा होतोय ना पण छळ !

मंगेश : सहकार्याची सक्ती करायची नाही हेही ठरलंय !

( गिरीश हिरमुसला होऊन स्वस्थ बसतो. )

गिरीश : मागे आपले एकदा बोलणे झाले होते – आपल्याकडचा एखादा बुद्धिवादी ( मंगेश मान उचलून पाहतो, त्याकडे दुर्लक्ष करत -- ) -- खरे आहे की नाही ते सांग -- एखादा समविचारी माणूस गेला ना, की स्मशानात येतो, कशाला, अंत्यदर्शन बुद्धिवादात बसतं की नाही मला माहीत नाही, तो हळूच डोकावून हे पाहतो की च्यायला मंत्राग्नीच देतायत वाटतं ! आणि खट्टू होऊन निघून जातो ! ( मंगेश पाहतोय. ) पण हेच भडाग्नी असेल तर तो थांबतो – त्या सहकाऱ्यावर एखादे भाषणही करतो -- आणि ते तिकडे, त्यांचे बाप, यूपीचे एक समाजवादी पुढारी आणि आपले आदरणीय सुपरस्टार, कपाळाला भस्म लावून, नाही, कपाळावर भस्म धारण करून चालत देवदर्शनाला जाताहेत ! ( क्षणभराने -- ) ते यूपी पुढारी ! ते खरे जगणं समजलेले जाणकार समाजवादी म्हण की बुद्धिवादी ! दोन विरोधी गोष्टी एकत्र घेणारे ! ही विरोधाभासी ब्रेकिंग न्यूज इंटरेस्टिंग नव्हती ?

मंगेश : फार वैचारिक बोलायचं नाही असंही आपलं ठरलंय !

गिरीश : तू केमिस्ट्रीवाला, वैचारिक बोलणं तुला शोभूनही दिसणार नाही म्हणा ! मुळात जमणारही नाही फारसं ! आणि यातला गंमतीचा भाग सोडून, आख्खं आयुष्य शैक्षणिक क्षेत्रात घालवल्यावर वैचारिकपणाची सवय होणारच की ! दुसऱ्या कशात मन रमू शकेल ?

मंगेश : ते आहे म्हणा !

गिरीश : मग ? सांगू का ? आजची ?

मंगेश : मला इंटरेस्ट वाटलं तर मलाच टीव्हीवर दृश्यांसह सविस्तर पाहता नाही का येणार ?

गिरीश : लावू का ? तुला आवडत नाही म्हणून बंद केलाय !

मंगेश : नको !

गिरीश : का ?

मंगेश : ( संतापून -- ) नको ! नको ! !

गिरीश : तू एक हायस्ट्रंग -- भावनिक माणूस आहेस !

मंगेश : आणि तू -- भावना करपून गेलेला ! वैचारिक !

गिरीश : ( क्षणभराने -- ) वर्मी घाव घालायचा नाही -- असंही ठरलंय आपलं !

मंगेश : सॉरी !... हे असलं वर्मबिर्म नसावंच साल‌ं कुणाला !

( आता गिरीश उठतो. दारूची तयारी करतो आहे. ग्लासेस, पाणी वगैरे. )

गिरीश : म्हणजे तू काय जगायची पध्दतच बदलायला चाललास काय ! वर्म असणार, मानअपमान असणार, वर्चस्वाची इच्छा असणार ! पण समता हवी, अन्याय नको !

मंगेश : मी बोलतो का कधी असलं ! ? वैचारिक ?

गिरीश : तू नाही, पण डोक्यातून जात नाही !

मंगेश : काय ?

गिरीश : सांगू का ?

मंगेश : ( हसून -- ) भिकारी बरा रे तुझ्यापेक्षा ! बरं, सांग, चल !

गिरीश : तर आजची ब्रेकिंग न्यूज -- सर्वाणी केस ! किती इंटरेस्टिंग आहे खरे तर ! या वयात -- करून दाखवणे ! ( क्षणभराने -- ) नको, जाऊं दे ! मलाच कंटाळा आला ! (ग्लास उचलतो. )

मंगेश : ( ग्लासांचे स्पर्श -- ) चीअर्स !

गिरीश : चीअर्स !

मंगेश : वयाबियाचं नाही रे, संधी मिळावी लागते --

गिरीश : मिळायची काय, शोधतच असणार ते --

मंगेश : शोधायची तरी काय गरज, जाणवतच असणार ती अशा लोकांना – पण, कंटाळा कसला आला ?

गिरीश : आपल्याला न जमलेलं बोलायचा --

मंगेश : ये हुई ना बात ! झालं आपलं एकमत !

गिरीश : असं जमत तर राह्यलाच हवं ना – हेही नसतं झालं तर मी काही राहिलो नसतो बाबा इथं !

मंगेश : साल्या, बिनभाड्याचं मैत्रीखात्यात राहतोयस माझ्या फ्लॅटवर आणि माझ्यावरच उपकार !

गिरीश : एक दिवस मी स्वैपाक करतो, एक दिवस तू ! आपण दोघंही आवडीनं एक दिवसाआड जेवतो ! कधी ?

मंगेश : मान्य ! तुझा स्वैपाक असेल तेव्हा !

गिरीश : त्यामुळं, तुझा फ्लॅटबिट विसरायचं ! याही वयात, त्यातल्या त्यात आनंदानं जगतोय आपण ही बडी खबर म्हणालास नं, त्याचं कारण एक दिवसाआड का असेना, पोटाला आवडतं अन्न मिळणं !

मंगेश : ( आठवणींत जात -- ) किती वर्षं चाललंय हे आपलं असं ! आपली कॉलेजं वेगवेगळी असली तरी मधनं मधनं भेटायचोच आपण ! आपण दोघंही थोड्याफार अंतरानं विधुर झालो आणि आपली दोघांचीही मुलं लग्न करून अमेरिकेत स्थायीक झाली ! त्यानंतर तर जास्तच !

मंगेश : ( क्षणभराने -- ) ए, जाऊं दे, चल ! पी ! पुढचा भर !

गिरीश : तू भर !

मंगेश : बरं, मी भरतो ! एकदा मानापमान चालू झाले की तोडताच येत नाही सालं ते चक्र !

गिरीश : वैचारिक बोलणं टाळायचं म्हणजे हे असलं सपक बोलत राहावं लागतं ! कंटाळवाणं !

मंगेश : रोजच्या जगण्यातलं लाईफ हरवलं नं की मग माणसाला सारखी सेन्सेशनची गरज वाटते ।
-- असं वाचलंय मी !

गिरीश : हे तुझं स्वत:चं असणं शक्यच नाही ! वाचलेलंच असणार कुणाचं तरी !

मंगेश : बरं, जाऊं दे, चल !

गिरीश : ओके, ओके !

मंगेश : आणि आपण ऐकलेला तो दोन पोरांमधला संवाद -- बारमधलाच ! पोलीस !

गिरीश : आपण बडे बाप के बेटे नसल्याची आपल्या आयुष्यातली उणीव भरून काढणारा –

मंगेश : यस --

गिरीश : ( आठवणीत -- ) साला हम तीनचार खडे थे वहाँपर ! ऑर्केस्ट्रा होनेवाला था, बहुत भीड थी ! एक मामा आया, हमको पूछता है, यहाँ क्यूं खडे हो रास्ते में ? मैने कहा, हमारी लडकियाँ आनेवाली हैं, राह देख रहे हैं ! थोडी देर बाद फिरसे आया, साला समझ गया था की आनेवाली सभी लडकियों को अपनाही समझकर हम वहाँ खडे थे ! मैंने कहा, बोला ना साले, दुबारा मत पूछना ! अपना काम कर !

मंगेश : फिर तीसरी बार भी आया ?

गिरीश : आया, तीसरी बार भी आया ! अपना तो खून खौल गया ! एक झापड मारा साले को, तो रास्ता क्रॉस करके दुसरी ओर जा के गिरा !

मंगेश : वाट लगी क्या फिर तुम्हारी ? ये तो फौजदारी हो गई बाप !

गिरीश : हाँ ! हुई ! मैं भी गया उस छोर, बोला, ऊठ साले ! अब क्या करेगा -- क्रिमिनल केस ? कर ले चल ! तेरी वाट लगाऊँगा मैं । ये सिर्फ तू और मैं जानते हैं, कितने मे मिटाता बोल !

मंगेश : फिर ?

गिरीश : कपडे झटकते हुए बोला, एक हजार ! मै बोला, ये ले, चल, मौज कर ! फिरसे इधर आनेका नै !

मंगेश : ( वर्तमानात -- ) वाईट वाटलं रे ! परिवर्तन पायजे रे !

गिरीश : कुठे ? श्रीमंतीनं माजलेल्या पोरांमध्ये ?

मंगेश : गरिबीमुळंच, मार खाऊन एक हजार घेतले त्यानं !

गिरीश : हं – पटू शकतं हे --

मंगेश : डोळ्यांत पाणी येण्यासारखंच आहे रे हे !

गिरीश : ते, तू संवेदनशील असल्यामुळं ! एरवी कुठलाही प्रसंग पिक्चरमध्ये तुम्ही कसा घेताय, म्यूझिक कसं मारताय त्याच्यावर असतं ! सत्य आपण निर्माण करतो रे ! सत्य असं काही नसतंच !

मंगेश : तुझा भाषाविषय असल्यामुळं तू मला असं बुचकळ्यात टाकतोस ! केमिस्ट्रीत असं नसतं !

गिरीश : छोट्या गावांतल्या कॉलेजांतले प्राध्यापक आपण ! आपल्याला फार तडफदारपणाची गरजच नव्हती !

मंगेश : असं कसं ? तुझे तर दोन कथासंग्रहही निघाले ! कुणी वाचले नाहीत ते, ते वेगळं ! शिवाय, अजूनही तुला कुठे कुठे इंटरव्ह्यू पॅनलवरही बोलावतात !

गिरीश : आयला, हो, परवाचाच एक किस्सा ! सांगायचा राहिलाय ! सांगू का ?

मंगेश : सांग, सांग !

गिरीश : एकाला मी विचारलं, केशवसुतांच्या वडिलांचं नाव काय ?

मंगेश मग ?

गिरीश : तुझं ठीक आहे, त्याचा विषयच मराठी होता, हे लक्षात घे !

मंगेश : बरं, मग ?

गिरीश : माहीत नाही म्हणाला ! वर आणखी बाहेर जाऊन तो माझीच बदनामी करत होता की म्हणे एक च्यूत्या तिथं बसलाय, तो कुणाच्याही वडिलांचं नाव विचारतोय ! रमेशच्या वडीलांचं नाव काय ? इट कॅन बी एनीथिंग ! सुहास, सूर्यकांत, अमिताभ -- एनीथिंग !

मंगेश : मग यात किस्सा काय आहे ? तू असं का विचारलंस ?

गिरीश : अरे, तुझं सोड, असं मी आधीच म्हटलंय ! केशवसुत म्हणजे केशव नामक पित्याचा पुत्र ! केशव ! इट वॉज दॅट सिंपल !

मंगेश : मराठीचाच होता तर त्याला यायला हवं होतं ! शिवाय ते कादंबऱ्या वगैरे ल्याह्यचे ना ?

गिरीश : कविता ल्याह्यचे ! ते सोड !

मंगेश : ते सोड -- म्हणजे ?

गिरीश : तू नको त्रास घेऊस -- या अर्थी !

मंगेश : हां, हां ! मीही तुला केमिस्ट्रीचा त्रास देतच नाही !

गिरीश : दोन्ही सारखंच आहे ! आभारी आहे !

मंगेश : आपलं किती सारखं आहे ना ? आपण दोघंही विधुर, दोघांचीही विवाहित मुलं अमेरिकेत, दोघांनीही लहान गावांत प्राध्यापकी केली, दोघंही एकाच वर्षी निवृत्त आणि दोघंही एकत्र राहतोय !

गिरीश : तुझ्या फ्लॅटवर !

मंगेश : ग्लास टाळक्यात घालीन साल्या ! ( गिरीश उठून उभा -- )

गिरीश : चढली काय ?

मंगेश : चढली ? अजून पितो साल्या ! आण !

गिरीश : नको, आज माझ्या हातचा स्वैपाक आहे ! जेवू या चांगलं !

मंगेश : टोमणे ! सारखे टोमणे मार तू ! ( तोही उठू लागतो ... इथे हे दृश्य संपते. पुढल्या दृश्यात मुकुटराव हे ५४ चे प्राध्यापक आणि त्यांची विद्यार्थिनी प्रियदर्शिनी -- सुमारे २४. दोघेही टीव्हीच्या चौकटीत आहेत. जरा मंद प्रकाश. त्यांना विचारले जाणारे प्रश्न गिरीशच्या आवाजात ऐकू येतात -- )

गिरीश : मुकुटराव आपण ५४ वर्षांचे प्राध्यापक आहात -- म्हणजेच शिक्षणक्षेत्रात आहात -- तर आपल्याला हे योग्य वाटतं का ?

मुकुटराव : काय ?

गिरीश : हेच -- तुमचं तुमच्या विद्यार्थिनीशी प्रेमप्रकरण होणं ! योग्य वाटतं ?

मुकुटराव : पाहिली गोष्ट, याचा शिक्षणक्षेत्राशी असा वेगळा संबंध लावू नका ! माणसं सगळीकडं सारखीच ! उगीच भ्रामक प्रश्न नकोत !

गिरीश : तरीही योग्य वाटतं ? वयातला हा फरक ?

मुकुटराव : मी एक खरा माणूस आहे, मला ते योग्य वाटतंच ! पण तुम्ही तिलाही विचारा !

प्रियदर्शिनी : योग्य वाटतं ! ( दोघेही टीव्ही चौकटीच्या बाहेर आलेले. )

गिरीश : विचारायच्या आधीच !

प्रिय : चॅनेलचा वेळ वाचवला !

गिरीश : छान ! पुन्हा मुकुटराव, तुम्हाला प्रश्न, या तुमच्या स्टोरीवर पिक्चर येत असून त्यात तुमची भूमिका आपले सुपरस्टार करणार आहेत असं ऐकतो !

मुकुटराव : शक्य आहे !

गिरीश : याबद्दल काय वाटतं ?

मुकुटराव : नका विचारू !

गिरीश : का ?

मुकुटराव : इथं कितपत खरं बोललेलं चालतं ते मला नीट माहीत नाही !

गिरीश : तसं काही नाही, बोला !

मुकुट : ते तिथं आमचं जगणं खोटं दाखवणार तर त्याला लोक टाळ्या मारतील पण आमच्या खऱ्या जगण्याला मात्र विरोध करत राहतील --

प्रिय : आम्हाला नका यावर बोलायला लावू -- कारण आम्हालाही थोडी लोकांच्या पाठिंब्याची गरज आहे ! आम्ही जास्त शहाणपणा केला तर आमचा पाठिंबा कमी होईल --

गिरीश : वाढतोय पाठिंबा ! सरांच्या तोंडाला काळं फासणारेच आता तुम्हा दोघांचे सत्कार करतायत ! हार घालतायत ! लव्हगुरू म्हणतायत सरांना !

प्रिय : सरांनी काही मला भरीला पाडलेलं नाही आणि आमच्यांतलं प्रेम खरं आहे, हे कळलं सगळ्यांना ! ( गिरीश आणि मंगेश प्रवेश करतात. प्रकाश नॉर्मल होतो. )

मंगेश : ( प्रिय.ला -- ) या सरांच्या बायकोनं तुमच्या झिंज्या धरल्या, मारलं तुम्हाला -- कशाला करता असले उपद्व्याप ? !

प्रिय : प्रेमासाठी ! प्रेमासाठी मी काहीही सहन करीन !

मंगेश : ( मुकुटरावांना -- ) आणि तुम्ही -- विवाहित आहात -- एक मोठा मुलगाही आहे तुम्हाला -- तुमच्या कुटुंबाबाबत -- विशेषत: पत्नीबाबत तुम्ही बेजबाबदारपणे वागताहात --

मुकुट.: हे बघा, मी घटस्फोट घेऊन तिला पोटगी द्यायला तयार आहे -- नाहीतर ही लग्न न करता नुसती माझ्याबरोबर राह्यला तयार आहे -- मी दोघींनाही संभाळायला तयार आहे !

मंगेश : तुमच्या पत्नीनं तुमच्यासारख्याला मुळीच घटस्फोट देऊ नये, असं मला वाटतं ! तिनं सतत तिचा हक्क गाजवत राहावं आणि बेजार करत राहावं तुम्हाला !

मुकुट : त्यापेक्षा सगळ्यांनी सुखानं जगण्याचा मार्ग काढावा असं आम्हाला वाटतं ! तुम्ही सांगाल तो मार्ग मान्य ! फक्त प्रेमाचा त्याग करायला सांगू नका !

मंगेश : धक्कादायक आहे हे आपल्या समाजात !

प्रिय.: एकतर मला असा परिपक्व साथीदारच हवा आहे आणि जगण्यात तर हजार प्रकारची अनिश्चितता आहे, तिचा मी विचार करत नाही -- आणि समाजाचं म्हणाल तर तो बदलू शकतो -- नीतीकल्पना बदलू शकतात --

मंगेश ( मुकुटरावांना -- ) चांगलं तयार केलंय विद्यार्थिनीला !

प्रिय.: माझी स्वत:ची समज अशी कमी लेखू नका !

मंगेश : सुपरस्टारचाचा सिनेमा -- यांच्या स्टोरीवरचा -- एकदा आला की पेवच फुटेल असल्या ॲब्नॉर्मल जोडप्यांचं !

प्रिय.: ॲब्नॉर्मल नव्हे, नॉर्मल !

गिरीश : तरीही, बरं का, एक विचार राहतोच की का बाबा तुमचं हे वागणं असं वेगळं होत असेल ?

प्रिय. : म्हणजे याची -- या वागण्याची कारणं ? अहो, अगणित असतात ! आणि त्यातलं अमुकच एक महत्त्वाचं असं काही नसतं ! म्हणजे बघा, एकदा विष्णू मझ्या स्वप्नात आले --

मंगेश : विष्णू हे आणखी एक प्राध्यापक का ?

प्रिय : नाही, नाही -- देव हो ! देव विष्णू !

मंगेश : हं, हं !

प्रिय.: तर त्यांनी स्वप्नात येऊन एकदा मला संगितलं की बालिके, सुमारे पाचशे वर्षांपूर्वी, तुमच्या घराण्यातल्या एका कर्त्या पुरुषाचा जन्म व्यभिचारातून झालेला होता !

गिरीश : म्हणजे आई बरोबर नव्हती त्याची !

मंगेश : करेक्ट ना ! पुरुष या घरण्यातलाच धरला गेला ! तो -- जन्मलेला --अशा तऱ्हेनं !

प्रिय. : तर, हे जरी कधी कुणाला काही कळलं नाही, तरीही, त्याचे ताणतणाव, अपराधी भाव -- हे सगळं परिणाम करतच राहिलं ना ! पिढ्यान् पिढ्या ! आता हे कारण कसं ओळखता येणाराय सांगा !

गिरीश : छ्या ! विष्णू कशाला करायला बसलाय तुमचं असलं स्टिंग ऑपरेशन ! आणि एकदा ही पध्दत आहे म्हटल्यावर आख्ख्या मानवजातीचंच करावं लागणार हे ! आणि हे सगळं लक्षात ठेवायला त्यानं त्याची स्मरणशक्ती वापरायाची ! केवढा घाण खजिना होईल तो !

प्रिय. : ती यंत्रणा कशी चालत असेल ते मला माहीत नाही ! पण बघा, आता प्रश्न काय येतो, त्याची आई -- ती तरी असं का वागली असेल बाबा ?

गिरीश : घोड्याच्या खिंकाळण्याचा आवाज तिला मुळीच आवडत नव्हता -- हे असेल कारण !

प्रिय.: बरोबर ! तर हे असं आहे ! आणि असं बघत गेलं तर आख्खं विश्वच प्रत्येक घटनेचं कारण आहे असं म्हणावं लागतं !

मंगेश : आणि हे सगळं या विश्वातच घडत असल्यामुळं, काही घडतच नाही -- असं म्हटलं तरी चालेल !

प्रिय. : हे लॉजिक जरा अवघड जातंय सर, पण पटतंय मला हे !

मंगेश : अहो, सगळं एकच म्हटल्यावर याच्या बाहेर उभं राहून बोलणार कोण ?

गिरीश : ( काही क्षण विचार करून -- ) -- मग तर नीती-अनीती, गुन्हेगारी-शिक्षा -- यांना काही अर्थच राहणार नाही ! एवढा व्यापक दृष्टिकोण घेतल्यावर !

प्रिय. : तसं होऊ नये म्हणून अमानुषपणे आपण वागतोच आहे ना ! लाखो, कोट्यवधी कारणांनी घडलेल्या एखाद्या गुन्ह्याची शिक्षा एखाद्या माणसाला देतोच ना आपण !

मंगेश : पटलं, पटलं !

गिरीश : (मंगेशला -- ) पटलं काय ? काय पटलं ?

मुकुटराव : तर, नॉर्मल ! -- चला ! ( मुकुटराव आणि प्रिय. जाऊ लागतात -- )

गिरीश : थांबा ! ( दोघेही थांबतात. मुकुटरावांना बाजूला घेऊन -- ) हे सगळं -- दोन दोन बायकांसह -- झेपेल असं वाटतं ?

मुकुटराव : अहो, याला तोंड द्यायचा निर्णय घेतलेलाच होता -- मुख्य अडथळे आणि विरोध तर पार पडलेले आहेत -- आम्ही तर सर्वनाशही स्वीकारायला तयार होतो -- पुढचं आता सोपं आहे -- आणि दोन दोन बायका वगैरे -- डोंट वरी ! मैं हूँ ना !

मंगेश : ( प्रिय.ला -- ) स्पष्टच विचारतो -- हा असा वयस्कर पार्टनर, त्याच्या बायकोचं शत्रुत्व -- या अशा वातावरणात समाधान लाभेल असं वाटतं तुम्हाला ?

प्रिय.: प्रेम म्हणजेच आनंद ! ( जाते. मागोमाग मुकुटरावही जातो. गिरीश आणि मंगेश वळून एकमेकांकडे पाहात उभे. दोन क्षण. मग दोघेही येऊन समोरासमोर बसतात. )

गिरीश : तुला सांगतो, लोक म्हणतात की बिहार, उत्तरप्रदेश इकडे विद्यार्थी पास करणे, त्यांना मुबलक मार्क्स

देणे, हे फार आहे. आपल्याकडे सगळे प्रामाणिक जास्त असल्यामुळं भारतात इथली महाराष्ट्रातली मुलं मागं पडतात. पण तसं काही नाही -- इथंही पेपर फुटतात, कॉपी होते ! हे काही गुपित नाही !

मंगेश : पण, तरी काही कमीजास्त प्रमाण ?

गिरीश : तुला माहितीच नाही जणू ! एकदा, तुला सांगतो, एका इंटरव्ह्यूमध्ये नुसतं विचारलं की केशवसुतांच्या --

मंगेश : -- वडिलांचं नाव काय तर तो म्हणाला की रमेशच्या वडिलांचं नाव काहीही असू शकतं ... ( इथे हे दृश्य संपते... पुढच्या दृश्यात गिरीश त्याच्या जागी बसून टीव्ही पाहात आहे आणि एकीकडे मुकुटराव आणि प्रिय. जवळजवळ बसून टीव्ही पाहात आहेत. अर्थातच अतिठळक बातमी चालू आहे. तिघांचेही चेहरे दिसावे. गिरीश एकाग्र, मुकुटराव सस्मित, प्रिय. थोडी घाबरलेली. टीव्हीवर बातमी ...

' बिहारमधल्या दानापूर रेल्वे स्टेशनबाबतची ही अतिठळक बातमी. इथे रात्री बारानंतर, एका स्त्रीच्या भुताचा वावर असतो असं अनेकांचं म्हणणं असून तिच्या पैंजणांचाही आवाज येतो असं ते सांगतात. याच्या भीतीनं यावेळी स्टेशन जवळजवळ निर्मनुष्य असतं. पूर्वी एकदा इथल्या एका कर्मचाऱ्याला एका गर्भवतीचं प्रेत रेल्वेलाईनवर पडलेलं दिसलं, ते त्यानं उचलून बाजूला ठेवलं आणि संबंधित अधिकाऱ्यांना रिपोर्ट दिला. आता ती स्त्री त्या कर्मचाऱ्याच्या स्वप्नात येते आणि तिचा मुलगा कुठं आहे असं त्याला विचारते. त्यामुळे, सदर कर्मचारी अत्यंत भीतीग्रस्त आहे. इथल्या पोलीसकर्मचाऱ्यांचाही भूतयोनीवर विश्वास असून सदर स्त्रीचं भूत पाहिल्याचं तेही सांगतात. सदर स्त्रीभूत आकर्षक खुणा करून नवख्यांना बोलावतं आणि तिच्या मागे जाणाऱ्याला नंतर बेदम मारतं असं इथले लोक सांगतात. ' --

इथे मंगेश प्रवेश करतो, गिरीश टीव्ही बंद करतो. ' आता तर या भुताचा बंदोबस्त करण्यासाठी गावातल्या एका मांत्रिकाला बोलावण्यात आलेलं असून उद्या मध्यरात्रीनंतर हा मांत्रिक आपला मंत्रप्रभाव सूरू करेल असे सांगितलं जात आहे. ' मुकुटराव प्रिय.ची भीती घालवत तिला घेऊन जातात. पुढचे दृश्य अर्थातच मंगेशच्या फ्लॅटवरचे सुरू ... )

गिरीश : बस ना ! सांगू का ?

मंगेश : ( बसत -- ) सॉरी ! मला इंटरेस्ट नाही --

गिरीश : फार अवघड होतं बुवा हे असं --

मंगेश : मी पेपरही कसा वाचतो तुला माहिती आहे -- बरंचसं -- हेडलाईन आणि पहिल्या दोनतीन ओळींतून ते काय आहे हे मला समजतं -- मी पुढे वाचत नाही. अग्रलेखही कशावर आहे आणि त्याचा साधारण रोख काय आहे हे सुरुवात, मध्य आणि शेवट यांतली दोनचार वाक्यं पाहून समजून घेतो आणि बाकीचं सोडून देतो. एखादी गुन्हेगारीची बातमी समजा रोज पुढे पुढे चालू आहे -- ती जर मला माहीत असेल तर थोडीफार पाहतो, नाही तर पूर्ण सोडूनच देतो ! क्रिकेट, टेनिस, हॉकी यांच्या बातम्या आणि जाहिराती तर मुळातच रद्द करतो ! शेअरबाजारातलं मला काही समजतच नाही आणि आंतरराष्ट्रीय राजकारण वगैरेत तर आयुष्यात मी कधीच इंटरेस्ट घेतलं नाही ! काय बिघडलंय माझं ?

( दोन क्षणांनंतर -- ) जनरली माणसं एकमेकांशी हलकटपणानंच वागतात हे मला समजलेलं आहे -- याचे तपशील किती भरायचे डोक्यात ?

गिरीश : पेपरचं बिल मी देतो तेच बरोबर आहे !

मंगेश : आणि हेही जे मी थोडंफार पाहतो, इंटरेस्ट घेतो, त्यातलं बरंचसं मी तीनचार दिवसांत विसरून जातो !

यामुळं, आजपर्यंत, माझं कधीच, काहीच अडलेलं नाही ! फक्त राहतं काय, कुणीतरी, कधी माझ्यापुढे यातला कुठला विषय काढला तर मला ते काही माहीत नसणं, याच्या न्यूनगंडाचा प्रश्न ! त्याचं मी टोटली उच्चाटनच केलेलं आहे ! आणि बरीचशी जनता अशीच असते ! आणि जे अगदी ईमानदारीत वाचून हे सगळं लक्षात ठेवणारे, चर्चा करणारे असतात ना, त्यांना फक्त पेपरात आलेलंच माहीत असतं -- खरं, आतलं राजकारण काय आहे, हे त्यांना कळतच नाही ! थोडंफार समकालीन राह्यचं -- बास !

गिरीश : नशीब, तेवढं तरी पटतंय ! पण माझं एकच म्हणणं आहे -- तू बडी खबर तरी अशी अव्हेरू नयेस ! आज तर एका स्त्री भुताची आहे ! बडी खबर !

मंगेश : पैंजण वाजणं, गाणं म्हणणं --

गिरीश : आणि बेदम मारणं !

मंगेश : आय नो इट !

गिरीश : बिहारच्या दानापूर स्टेशनवरचं ?

मंगेश : कुठलं का असेना ! तेवढं पुरेसं आहे !

गिरीश : आता तर तुला केमिस्ट्रीचीही गरज नाही, कारण शिकवणं थांबलंय !

मंगेश : खरोखर ! विसरत चाललोच आहे मी !

गिरीश : अरे मग तर हे हळूहळू मरणच चालू झालंय की रे तुझं !

मंगेश : आपल्या अनेक अटींपैकी -- आपापल्या विषयांतलं बोलून एकमेकांना बोअर करायचं नाही -- ही अट किती महत्त्वाची ठरलीय !

गिरीश : अरे हे जगण्यातलं आहे – मराठीतलं असं नाहीय -- बरं, भुताचं जाऊं दे ! एक महाराज, लोकांनी भरीला पाडल्यामुळं, समाधी घ्यायला तयार झाला आणि लोकांनी त्याला जिवंत गाडलं -- हेही तुला धक्कादायक वाटत नाही ?

मंगेश : अरे जगात धक्कादायक खूप असतं !

गिरीश : पोलीस तिथं गेल्यावर आता लोक म्हणतायत की तो महाराज आधीच मेलेला होता !

मंगेश : हे सगळं ठीक आहे !

गिरीश : अरे पण --

मंगेश : ( ओरडतो -- ) नकोय ! बास !

गिरीश : ( दोन क्षणांनी -- ) तू ना एक हायस्ट्रंग पर्सनॅलिटी आहेस ! भावनिक नुसता ! सटकूराम !

मंगेश : मला पुन्हा तुझ्या वर्मावर घाव घालायची इच्छा नाही ! अट पाळायचीय मला ! ( शांतता. )

गिरीश : बरं, ते सोड, पण , आपण त्या सर्वाणी केसबद्दल काहीच बोललो नाही --

मंगेश : काय बोलणार ?

गिरीश : मला तर गिल्टी वाटतं ! त्यांनी केलं किंवा नसेलही केलं पण, त्या मार्गात तर होते ! त्यामुळं ते चर्चेत आले -- मी तसं काही न केल्यामुळं लपून राहिलो --

मंगेश : यालाच संयम म्हणतात -- चांगलंच ना ते --

गिरीश : यशस्वीही होऊ शकलो असतो --

मंगेश : या वयात हे विचार !

गिरीश : वयाचा काय संबंध ? माणूस मेंदूमयत होईपर्यंत त्याच्या डोक्यात परलिंगी आकर्षण चालूच असतं ! शास्त्रीय सत्य आहे हे ! अमेरिकेत सत्तरीतही लोक डेटिंग करतात !

मंगेश : आपण इथे राहतोय --

गिरीश : जर जमलं ना असं प्रेमाचं तर ते औषधीही असतं म्हणे ! माणूस जास्त जगतो ! अर्थात औषध म्हणून कुणी प्रेम नाही करू शकत म्हणा --

मंगेश : आता काय उपयोग आहे ?

गिरीश : तू ज्याला संयम म्हणतोस ना ते मला मन मारणं वाटतं ! घाबरत आलो आपण नुसते -- एक विचारू का, आपण ५२--५३ चे असताना आपलीच एखादी विद्यार्थिनी आपल्या प्रेमात पडली असती तर ?

मंगेश : होऊनही गेलं असेल असं !

गिरीश : आपलाही प्रतिसाद असता तर ?

मंगेश : म्हणजे आपण मुकुटराव असतो तर ? मग आपला काय संबंध ?

गिरीश : खरं तर हा केमिस्ट्रीचा विषय नाही !

मंगेश : कुणी कुणाला हीन लेखायचं नाही हेही आपण मान्य केलेलं आहे !

गिरीश : एवढ्या सगळ्या अटी माझ्या लक्षात राहात नाहीत -- आपण जरा कमी करू या त्या अटी !

मंगेश : नो ! तू अनावश्यक भरताड डोक्यातून काढून टाक म्हणजे या आवश्यक अटी तुझ्या लक्षात राहतील !

गिरीश : परिवर्तन कर मग सगळ्या माणसांत ! निदान तुझ्यामाझ्यात ! ( इथे गिरीश जरा नाराज होऊन त्याची खुर्ची उचलून रंगमंचाच्या पुढच्या भागात कडेला घेऊन जाऊन तिथे बसतो. काही क्षणांनी प्रिय. येते. )

प्रिय.: ( मंगेशला -- ) सर, मला जरा तुमच्याशी बोलायचंय सर -- जरा म्हणजे बरंच सर --

मंगेश : ठीक आहे, मी माझ्या बायकोच्या फोनची वाट पाहतोय, तो येऊन गेला की बोलू --

प्रिय.: चालेल सर ! ( क्षणभराने -- ) बसू मग मी ?

मंगेश : हं, बसा ! तुम्हाला काही वाचायला देऊ का ?

प्रिय.: नको सर, घरून वाचूनच आलेय मी -- हे असं नुक्तं वाचलं आणि बाहेर पडले सर --

मंगेश : बरं, राहू दे --

प्रिय.: खरंच सर -- मी संकोच नाही करत --

मंगेश : संकोच हवा पण स्त्रीजातीला --

प्रिय.: तसा आहे सर, पण आपल्या माणसाशी काय ना --

गिरीश : बडी खबर रे बाबा, बडी खबर ! पण एकही बातमी नीट न वाचायच्या सवयीमुळं वाट लागणार ! बातम्या नीट वाच, बातम्या नीट वाच, सांगत होतो !

मंगेश : काही डिफिकल्टी आहे का ?

प्रिय.: मला तर काहीच नाही सर ! तुम्हाला ?

मंगेश : आँ ? मला ?

प्रिय : मी इथं जरा वेळ थांबले तर, म्हणतेय मी !

मंगेश : हं हं ! नाही नाही ! थांबा थांबा !

प्रिय.: सर, तुम्ही आणखी काय करताय ?

मंगेश : म्हणजे ?

प्रिय. : नाही, तुमच्या बायकोच्या फोनची वाट पाहण्याव्यतिरिक्त म्हणतेय मी !

मंगेश : हं हं ! तसं काहीच नाही !

प्रिय : मग तोपर्यंत आपण गप्पा मारल्या तर ?!

मंगेश : चालेल, पण नको ! मी जरा दुसऱ्या एका विचारातही आहे !

प्रिय.: विचार करा सर ! कुठल्याही कामात आपलं पूर्ण मन नसतंच कधी ! त्याचा एक भाग दुसराच

कुठलातरी विचार करत असतो ! ( हसते. ) आणि सध्याही सर, तुमच्या त्या चालू असलेल्या विचाराबरोबरच माझाही विचार चालू असणारच  आहे ! मनात तुमच्या !

मंगेश : तुमचा कसला विचार ?

प्रिय.: मी आहे इथं याचाच हो सर !

मंगेश : तुमच्या कामाचं स्वरूप सांगता का मला ?

प्रिय.: फोन येऊन जाऊं द्या ना सर, मला काही घाई नाही -- आणि तेवढंच जरा जास्त वेळ --

मंगेश : काय ? जास्त वेळ काय ? सांगून टाका ! फोन येणार नाहीय -- उगीच म्हणालो मी -- ( ती गप्प. ) बोला ना -- बोला  --

प्रिय.: प्रेमाला, आदराला तुटकपणानं प्रतिसाद देताय सर तुम्ही ! पुन्हा एकदा विचार करा सर !

गिरीश : कसला दगडाचा विचार करणार ? इतक्या वर्षांत कष्टपूर्वक कमावलेला आंधळेपणा आहे ! एकटा असेल तेव्हा पुन्हाच काय पुन्हा पुन्हा विचार करेल !

मंगेश : पटकन कामाचं बोला --

प्रिय.: हेच सर ! प्रेमाला प्रेमाचा प्रतिसाद मिळवणं !

मंगेश : काय !?

गिरीश : माणूस एका स्वभावाचा असला पाहिजे हे फिटच केलंय ना सगळ्यांनी ! हवंच ना पण तसं ! नाही तर व्यक्तिचित्रण – स्वभावचित्रण यावर प्रश्नच नसते विचारता आले मग  !

प्रिय.: ( काही क्षणांनी -- ) होय सर, आहेच मला एक डिफिकल्टी --

मंगेश : हं --

प्रिय.: म्हटलं तर तुमच्याच विषयातली आहे --

मंगेश : हं --

प्रिय.: जाऊं द्या सर, मी जाते -- ही डिफिकल्टी घेऊन मी आता दुसऱ्याच विषयाच्या सरांकडे जाते --

मंगेश : हं -- ( ती जाते. ) आँ ?

गिरीश : आपल्याला जमू शकेल अशी बडी खबर कोणती असा तरी एकदा आणि एकदा तरी विचार करावा माणसानं -- प्रत्येकात एक तरी गुण असणारच --

मंगेश बडी खबरचं सेन्सेशन तुला आहे, मला नाही !

गिरीश : मी एक बडी खबर तयार करायला घेतलेलीच आहे आणि ती तू टीव्हीवर बघशीलच !

मंगेश : मी बघतच नाही ना तसलं !

गिरीश : टीव्हीवर येईलच ती, असं म्हणतोय मी ! ( बोलण्याच्या ओघात त्यांच्या जागा बदललेल्या. ) शिवाय त्यातून समाजसुधारणाही होणार आहे !( गिरीशला पैंजणाचा आवाज येतोय. दोन क्षणांनी प्रिय. येते. )

प्रिय.: सर ! --

गिरीश : ( रुक्षपणे -- ) काय आहे ?

प्रिय.: काही नाही सर -- ( जाते. )

मंगेश : बडी खबर मुद्दाम घडवणं वेगळं -- आपोआप बडी खबर होईल असं काही तयार करू शकलो नाही आपण आपल्यात --

गिरीश : किंवा अजून तरी ते व्यक्त झालेलं नाही --

मंगेश : व्यक्त झालंय -- उघड झालेलं नाही ! आपलं ओम् आणि स्वस्तिक काय होतं ?

गिरीश : इथलं काही माहीत नसल्यामुळं उगीचच काहीजण बिहारला नावं ठेवतात -- कॉलेजांचे प्रिन्सिपॉलच

द्यायचे सूचना आपल्याला -- ओम म्हणजे अमूक कॉलेज आणि स्वस्तिक म्हणजे तमूक कॉलेज – सगळ्या विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकांवर आपापलं चिन्ह ल्याह्यचं ! आणि ती चिन्हं पाहून आपण सढळ हस्ते गुण उधळून आपापल्या कॉलेजांचे निकाल चांगले लावायला हातभार लावायचा ! शिवाय कॉप्यांना किती प्रोत्साहन द्यायचो आपण ! हे सगळं कधीच, कुठंच उघड झालं नाही ! होती तशी बडी खबरच ती !

मंगेश : आणि तू ते केशवसुतांच्या वडिलांचं सांगत बसतोस --

गिरीश : पण बरं झालं, बचावलो ! वाटच लागली असती !

मंगेश : एक तर विद्यार्थी यथातथाच होते आणि मग आपलं शिकवणंही तसंच होत गेलं -- कमी कष्टांत भागतंय तर कशाला ? -- असं !

गिरीश : मराठीत, पण, जीव खाऊन शिकवावं असं फारसं काही नाहीच आहे -- असं जाणकार म्हणतात !

मगेश : म्हणजे आपण स्वत: मराठीचे निवृत्त प्राध्यापक असूनही त्या विषयाचे आपण स्वत: जाणकार नसल्याचं आपण कबूल करत आहात !

गिरीश : मराठी आणि केमिस्ट्री -- काय फरक आहे ?

मंगेश : केमिस्ट्रीत कविता नसते आणि मराठीत रसायन नसतं !

गिरीश : एक वेळ नवरस नसतील पण रसायन असतं ! माझा मराठाचि बोल कौतुके --

मंगेश : तेवढं मराठी आम्हालाही येतंय --

गिरीश : आमची पिढी गेली कशीतरी -- मी तर आता विद्यार्थ्यांना सांगतो, मराठी घेऊच नका -- उगीच खोटा सल्ला देऊन नुकसान कशाला करायचं कुणाचं ?

मंगेश : केमिस्ट्रीला तसला प्रॉब्लेम नाही -- म्हणूनच आमच्यापुढं तुम्हाला न्यूनगंडानं वागावं लागलं !

गिरीश : पूर्वी मंत्रानं बाण सुटायचे, विमानं उडायची, पाहिजे त्या वस्तू, व्यक्ती हजर करता यायच्या -- तेव्हा भाषेला जे महत्त्व होतं ते आता कसं असेल ?

मंगेश : भाषा पूर्वी तरी काही केमिकल ॲक्शन करू शकली असेल का ? माझा नाही विश्वास --

गिरीश : बरं, ते जाऊं दे ! ( क्षणभराने -- ) सांगू का ?

मंगेश : काय ?

गिरीश : मी घडवतोय ती ब्रेकिंग न्यूज ? उद्याची ? म्हणजे काही दिवसांनंतरची ?

मंगेश : ( क्षणभर पाहून -- ) बरं, सांग चल ! ( तो आता आपली कामे करत -- पिशवीतले कागद कपाटात ठेव, कपाटातले पिशवीत ठेव, कपड्यांच्या घड्या कर इ. करत ऐकतो आहे. गिरीश भिकाऱ्यासारखा त्याच्या मागे मागे फिरत ऐकवतोय. मध्येच मंगेश, चकित होणे, किंचित स्मित देणे, मोठ्याने हसणे, विचारात पडल्याप्रमाणे एकटक गिरीशकडे पाहणे – असेही काही करत राहतो – गिरीशचे सांगणे आणि मंगेशच्या कृती यांचा काही संबंध नाही -- )

गिरीश : धार्मिक बाब आहे. पण हेतू चांगला आहे. मला एक भटजी भेटले होते. ते म्हणाले की, आम्ही एक टोळीच तयार ठेवलेली आहे. कोणताही धार्मिक कार्यक्रम तुम्हाला कधीही करायचा असू दे -- लागणाऱ्या सगळ्या सामानासह आमचा माणूस त्या वेळी हजर होणार. नुसतं फोनवर ऑर्डर, पत्ता दिला की पुरे. त्यावरून त्यांनाच पुढे मी एक आयडिया सुचवली. विशेष म्हणजे त्यांनी ते सगळं मनावरच घेतलं. मी म्हटलं, तुम्ही थोडंफार भांडवल घालणारा माणून पाहा आणि एखादी ' ब्रह्माविष्णूमहेश पुण्योत्पादन ' नावाची कंपनी काढा. त्यांच्यातर्फे निरनिराळ्या पूजा आधीच लॉटमध्ये करून घ्यायच्या, भटजींना दक्षिणा वगैरे देऊन टाकायची. भटजींनाही या पूजा लॉटमध्ये

मिळत असल्यानं ते निम्म्या दक्षिणेत काम करतील. नवग्रहशांत, वास्तुशांत, राहू जप, सत्यनारायणपूजा -- हे सगळं करायचं. आणि त्या त्या पूजेच्या फळांची रेडी पॅकेट्स् करायची. फक्त नाव, तिथी, संकल्प वगैरे प्रत्येक गिऱ्हाईकाला पॅकेट विकताना एका कागदावर लिहून द्यायचं. तेवढं त्यानं घरी जाऊन वाचायचं आणि पॅकेट फोडून आतला बत्तासा म्हणा किंवा खडीसाखर म्हणा घरात प्रसाद म्हणून खायची की त्या पूजेचं फळ मिळणार ! पूजा आधीच करून दक्षिणा वगैरे देऊन झालेली असणार ! काम काहीच नाही ! एक मिनिटात काम ! पाचशे, हजार, तीन हजार अशा श्रेणींच्या किंमतींची पूजा पॅकेट्स् ठेवायची ! काही गरीब लोकांनाही पूजा घालायची इच्छा असते पण पैसे नसल्यामुळं बिचारे पुण्य मिळवू शकत नाहीत. त्यांच्यासाठी दहादहा रुपयांचीही पॅकेट्स् ठेवायची ! ( एक दोन क्षणांनंतर -- ) यात काय आहे की या कंपनीची विश्वासार्हता फार महत्त्वाची ठरणार. तर हे लॉटमधले पूजापाठ जेव्हा जेव्हा केले जातील तेव्हा तेव्हा ते कुणालाही पाहता यावेत असे जाहीर आणि खुले ठेवायचे ! बास ! मग एखाद्याला समजा संध्याकाळी खूप लोकांना बोलावून फंक्शनच करायचं असलं तरी तीच खडीसाखर एखाद्या खाद्यपदार्थात घालून बडा प्रसादही करता येईल ! तर ते कामालाच लागलेत ! आजच्या काळाची ही गरजच आहे, हे त्यांना पटलेलं आहे ! नाही तरी लोक अभिषेकांसाठी वगैरे देणग्या पाठवून प्रसाद-अंगारा पाकिटं घेतातच ना ! तसंच हे ! वेळ अजिबात वाया न घालवता पूर्ण -- म्हणजे झेपेल तेवढं पुण्य ! -- कशी आहे कल्पना ? ते एका बँकेकडं प्रपोजलही करणार आहेत ! त्यांचा पहिला प्रॉडक्शन लॉट बाहेर आला रे आला की ही बडी खबर होईल ! आधीच त्याचीही योजना करूनच ठेवायची ! टीव्ही चॅनेल गाठून !

मंगेश : बास ना आता – कंटाळवाणं आहे हे अत्यंत --

गिरीश : बरोबर – हे नुसतेच धार्मिक-व्यावसायिक आहे – यात लैंगिक काही नाही – धार्मिक आणि लैंगिक एकत्र कसं असेल ? पण ऐक -- आणि याच पध्दतीनं मेहूण पॅकेट्सही ठेवायची ! एकदम लॉटमध्ये दोनदोनशे मेहुणं जेवायला घालायची ! यातही शक्यतो आर्थिक कमकुवत घटकांतली घ्यायची -- म्हणजे थोडं समाजकार्यही झालं ! साधारण हजाराला एक मेहूणपॅकेट ठेवायचं ! पुढं पुढं मग परदेशातल्या आपल्या लोकांसाठी एक्स्पोर्टही करता येतील हे प्रॉडक्टस् ! धंदा वाढून फायदा तर होईलच पण शिवाय आपल्या परंपरा आणि संस्कृती टिकायलाही मदत होईल ! वेळ आणि पैसा यांच्या कमतरतेमुळं पुण्य मिळण्यात अडथळे जे येतात तेही जातील !

मंगेश : तू त्यांना कशाला सांगितलीस ही आयडिया ? त्यापेक्षा पेटंट घ्यायचं होतंस तू याचं !

गिरीश : काय करायचंय ! पुण्य किती मिळेल ते बघ ना ! मला !

मंगेश : अरे पण याचं जरा पैशांतही रूपांतर केलं असतंस तर सतत हाय लेव्हल दारू नसती का पिता आली ?! ( इथे हे दृश्य संपते. पुढच्या दृश्यात टीव्ही चौकटीत -- मुकुटराव. हा आता सेक्सी सॅम या सुपरस्टारने केलेल्या रोलच्या वेषात असून त्याच्या कपाळावर भस्म आणि ठळक गंधटिळा आहे. गिरीश आणि मंगेश बसलेले. )

मुकुटराव : ( गिरीशला -- ) आज सांगा तुम्ही मला तुमची बडी खबर !

गिरीश : आता पुन्हा नाही ! कंटाळवाणं होईल ! आणि अजून घडायचंय ते सगळं !

मुकुटराव : ओके, ओके -- नो फोर्स !

मंगेश ते असूं दे ! पण हे काय ? पिक्चरमध्येसुध्दा तुम्ही जेव्हा देवापुढे उभे राहता तेव्हाही त्या उभं राहण्यात लाचारी नसते -- हक्क असतो -- फोर्स असतो ! मग बाहेर हे असं का ? ' नो फोर्स ' म्हणणं !

मुकुटराव : पिक्चरमधलं माझं सगळं बघायला मलाही बरं वाटतं ! घडावं वाटतं असं ! आधार वाटतो ! माझा

मलाच ! इकडे मी आस्तिक असलो तरी तिकडे नास्तिक व्हायला मस्त वाटतं ! धाडसी वाटतं !

मंगेश : तुम्हीही तिकीट काढून बघा मग तुमचे पिक्चर !

गिरीश : आणि तुम्ही व्हिलनला ललकारता तेव्हा शिट्ट्या मारा !

मुकुट.: काय प्रॉब्लेम काय आहे तुम्हाला ?

मंगेश : लोकांचा कमकुवतपणा लुटता तुम्ही !

मुकुट.: नुसता लोकांचा नाही, माझाही !

गिरीश : इतका मोठा आंतर्विरोध !

मुकुट.: तुम्ही शिक्षणक्षेत्रात होतात काय ? त्यामुळंच एवढे बावळट राहिलात ! शिवाय मराठी माणूस तर आहातच ! अहो, विसंगती असतातच ! माणसाचं मन म्हणजेच आंतर्विरोध ही साधी गोष्ट तुम्हाला समजू शकली नाही -- आयुष्य संपत आलं तरीही ! तुम्ही आयुष्यभर नुसत्या नैतिक गप्पा मारत राहिलात आणि आंतर्विरोधाशिवाय माणूस असू शकतो असा भ्रम जोपासत राहिलात ! ' बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले !! ' तुमच्या अनेक पिढ्या या सुभाषितात बरबाद झाल्या ! सगळीकडे तुमची पीछेहाट झाली ! जगण्याच्या एकूणच मैदानातून बाहेर पडणंच तुम्ही पसंत करत राहिलात ! काहीही मोठं, भव्य करायचं असेल तर तसेच मोठे आंतर्विरोध पेलावे लागतील, हे तुम्हाला कळलंच नाही !

गिरीश : म्हणजे तुम्ही जे काय करताय ते मोठं, भव्य आहे ?!

मुकुट.: माझ्या पिक्चर्सचं सोडा हो ! जगातला नंबर वन लोकप्रिय नट असणं, या वयातही सुपरस्टार असणं, सगळ्यांत जास्त पैसे कमावणं, मी आजारी झालो की कोट्यवधी लोकांनी हवालदिल होणं -- हे सगळं छोटं वाटतं तुम्हाला ? मग मोठं म्हणजे काय ? तुम्ही तत्त्वज्ञानाच्या अंगानं नका बघू --

मंगेश : पण चांगलं आहे का हे सगळं ? जे खोटं आहे ते वापरत राहणं ?

मुकुट.: याचे परिणाम वाईट होत असतीलच, पण, अहो, सगळ्यांच्याच मनांचे परिणाम वाईटच होत असणार. आणि समजा मी सगळ्यांत मोठे आंतर्विरोध पेलत असल्यामुळं माझ्या जगण्याचे सगळ्यांत जास्त वाईट परिणाम होत असतील तरी त्याला अयोग्य कसं म्हणता ? होणारच ना असं ! याला एक वेळ तुम्ही अनैतिक म्हणू शकता पण बेकायदेशीर काही नाही यात ! मी कधी, मी फार मोठा अभिनेता असल्याचा वगैरे क्लेम करत नाही ! कुणाला वाईट म्हणत नाही ! नम्र असतो !

गिरीश : ते मात्र मान्य ! आम्हीही तुमचे चाहतेच तर आहोत – उगीच आपलं एक डिस्कशन करतोय झालं !

मुकुट.: महाराष्ट्र हीच मुख्यत: माझी कर्मभूमी आणि निवासभूमी आहे पण मूल्यभूमी नाही ! हे मान्यच आहे ना मला ! खऱ्या गोष्टी नाकारत बसायचा खटाटोप मी आयुष्यात कधीच केला नाही !

मंगेश : तुमच्या मोठेपणाचं रहस्यच सांगून टाकलंत म्हणजे तुम्ही आज !

मुकुट.: फक्त माझ्याच नाही ! अमेरिकेचे अध्यक्ष माझ्याहून खूपच मोठे ठरतात, कारण माझ्यापेक्षा खूपच प्रचंड विसंगती ते पेलतात !

मंगेश : त्यांनीही एक प्रकरण केलं होतंच की ! तुमच्यासारखं ! म्हणजे तुम्ही – मुकुट !

गिरीश : मग, एवढं सगळं कळत असूनही तुम्ही रोल्स सगळे असे का करता ? आंतर्विरोध नसलेले ? प्लेन ?

मुकुट.: पुन्हा तेच बोलावं लागेल ! पोटासाठी ! एकदा आपण हा पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून स्वीकारल्यानंतर मग दिग्दर्शकाला माझ्याकडून जे हवं ते चोख देण्याचा मी प्रयत्न करतो ! चित्रपट काढायला पैसा खूप लागतो हे लक्षात ठेवलं पाहिजे ! आणि मुख्य म्हणजे मला मानधनही मुबलक

मिळतं हेही विसरता येणार नाही !  आणि इथल्या लोकप्रियतेवर आधारित मिळणारं जाहिराती वगैरेंचं उत्पन्न !! कैसे भूलेंगे ?! आंतर्विरोध म्हणजे काय, हे किती सांगत बसणार ? !

गिरीश : पटतंय !

मुकुट.: व्यवसाय म्हणून पत्करल्यावर या विचाराचा उपयोग नाही ! चुकतही असेल ! त्रासही होतोच ना !

मंगेश : इतके पैसे मिळवण्यासाठी एवढा नम्रपणा तर लागेलच !

मुकुट.: तुम्ही अशा खोट्या गोष्टींत अडकलात की तुम्ही दरिद्री राहाल आणि मी अशा खोट्या गोष्टी निवडल्या की माझी भरभराट व्हावी !

गिरीश : ग्रेट !

मंगेश : सगळं बिनतोड आहे च्यायला !

मुकुट.: आता हे असं सगळं बोलणं मला बऱ्याच वेळी उपयोगी पडतं हे नक्की ! पण माझे हेही विचार कायमचे नसतात ! मी कुठल्याही विचारांच्या आहारी जात नाही !

गिरीश : तुम्ही ज्याला विचारांच्या आहारी जाणं म्हणता त्याला आम्ही वैचारिक नैतिकता म्हणतो ! निष्ठा म्हणतो !

मंगेश : बरं, या क्षणी आमच्याशी कोण बोलतंय तुमच्यातून ? मुकुटराव, सुपरस्टार, कर्मकांड करत कपाळावर भस्म धारण करणारा ख्यातनाम माणूस, सेक्सी सॅम की इतर कुठल्या रोलमधला इतर कुणी ?

मुकुट.: तुमच्या प्रश्नातच त्याचं उत्तर आहे ! एक कुणीतरी बोलत असलं तरी मुख्यत: स्वत:तल्या इतरांशी असणारं त्याचं घर्षणच बोलत असतं ! हे नक्की ! त्रास असतोच !-- किंमत मला मोजावी लागतेच ! जगात फुकट काहीच मिळत नाही !  इतकं खोटं पेलायचे कष्ट सोपे नसतात !

गिरीश : थोडक्यात म्हणजे आपल्या स्वत:चा आपल्याला असा एक  गुंता घडवत नेता आला पाहिजे की त्याच्या सततच्या आणि वारंवार वापरातून आपल्याला यश मिळालं पाहिजे -- आपली भरभराट झाली पाहिजे !

मुकुट.: माझं म्हणणं इतक्या क्लॅरिटीनं यापूर्वी कुणी मांडलं नव्हतं !

मंगेश : काय उपयोग आहे ? ! ही क्लॅरिटी तो त्याच्या अशा गुंत्यातून मांडतोय की यशस्वी होणं आणि भरभराट होणं याची शून्य कुवत असलेला गुंता !

गिरीश : मग तुझं काय आहे ?

मंगेश : शेवटी आपण एकमेकांचं अपयश एंजॉय करत राहणारेच रे ! आणि दुसऱ्यांच्या बड्या खबर्स ! एंजॉय !

मुकुट. : मला ऑकवर्ड होतंय, तुम्ही भांडू नका, प्लीज !

गिरीश : आमच्यातला न्यूनगंड हेच तुमचं भांडवल आहे ! भांडू नका काय !

मुकुट.: तुम्ही उगीचच माझा अपमान करताय ! मी कधी निष्कारण कुणाचा अपमान करत नाही !

गिरीश : कशाला कराल ? सगळ्यांचं जे काय आहे ते झाकून धकून नेणंच फायद्याचं आहे तुमच्या !

मुकुट.: तुम्ही आरोप केल्यासारखं कशाला बोलताय पण ?

मंगेश : आरोपच करतोय तो !  ( गिरीशला -- ) त्यांना जे जमलं ते आपल्याला जमलं नाही म्हणून त्यांच्यावर चिडून काय उपयोग ? मुकुटराव असो की सुपरस्टार !

गिरीश : हे जमण्यासाठी कोणते पूजापाठ करावे याची वेळीच माहिती घ्यायला हवी होती आपण !

मुकुट.: पूजापाठ हा एक भाग आहे हो त्यातला ! मेहनतही खूप लागते ! आळस चालत नाही ! उत्साह लागतो ! आणि जिद्द लागते – हे हवेच, अशी !

गिरीश : पण एक मात्र आता स्पष्ट आहे -- आपापले गुंते तयार करण्यात जर इतकी तफावत असणार असेल तर

समता येणं अशक्य आहे ! यापुढचं आयुष्य मी याच विषयावर चिंतन करत घालवीन बहुतेक !

मंगेश : नुसतं चिंतन काय कामाचं ? मंथनही व्हायला हवं !

गिरीश : ते तू सामील झालास तर होऊ शकेल ! पण तू पडलास भावनिक माणूस ! वैचारिकचा आणि तुझा छत्तीसचा आकडा ! तुझी न् माझी केमिस्ट्री कशी जुळणार ? आणि मी माझ्या माझ्यातच मंथनही केलं तरी तुम्ही त्याला चिंतनच म्हणणार !

मुकुट. : मला हे कुंथण वाटतं !

गिरीश : कुंथणे हा शब्द आहे पण कुंथण हा शब्द नाही !

मुकुट. : करायचा तयार ! होऊ द्या ना भाषेची प्रगती !

मंगेश : शिका ! मराठीचे प्राध्यापक ! नुसतं केशवसुत या शब्दावर किती दिवस गुजराण करणार ?!

मुकुट.: तुमच्या तुमच्यातल्या कुरबुरी गिरवत बसायला तुम्ही माझा उपयोग करताय !

मंगेश : नुसतं गिरवत नाही -- गिरवत आणि उगाळत बसायला ! आम्हालाही भाषा येते !

गिरीश : गिरवत आणि उगाळत पेक्षा उकरत जास्त करेक्ट आहे !

मंगेश : उकरायला तो काय उकिरडा आहे का ?

गिरीश : नाही तर काय आहे ?

मुकुट.: भाषेची वाट जरा निसरडीच असते पण !

मंगेश : घसरडी म्हटलं तर ?

गिरीश : नो ! निसरडीच बरोबर आहे !

मंगेश : काय म्हणायचंय ते कळलं की झालं ! एखादा माणूस भाषेचा आहे म्हणून त्याचं महत्त्व वाढवायचं काही कारण नाही !

गिरीश : केमिस्ट्रीवाल्याचं तर वाढू शकतही नाही म्हणा ! जगण्यातल्या प्रश्नांत !

मुकुट.: मी असा फार वेळ एकाच पध्दतीनं जगू शकत नाही -- आता सेक्सी सॅमची वेळ झाली -- मी जातो --

गिरीश : कपाळावरचं भस्म, गंध तरी पुसा मग त्या सॅमसाठी !

मुकुट.: त्याची काही गरज नाही -- प्रत्येकात असे सगळे गोंधळ असणारच आहेत, हे सगळ्यांना समजतं हल्ली !

मंगेश : त्यांनी जगणं आपल्यापेक्षा खूपच एफिशियंटली हाताळलंय बाबा ! दुसऱ्यांना शिकवत राह्यची आपली सवय इथं काय कामाची ?

गिरीश : आणि मुख्य म्हणजे मुकुटरावांचं म्हणजे स्वत:चं डोकं वापरून त्यांनी सुपरस्टारचे विचार सांगितले, हे तर फारच ग्रेट झालं ! महाग्रेटच म्हणावं लागेल याला !

मुकुट.: नाही नाही, तसं काही नाही ! अच्छा ! ( जातो. )

मंगेश : एवढं असूनही तो किती नम्र राहू शकतो ते बघ !

गिरीश : एवढं असूनही नव्हे, एवढं असल्यामुळंच ! ( आता तो दारूचे सामान एकत्र करून आणत बोलतो -- ) समज असे लोक भेटले आपल्याला तर आता त्यांचा तरी आपल्याला काय उपयोग आहे ? आपलंही तसं सगळं फिक्सच होत गेलेलं आहे !

मंगेश : तू वैचारिक, मी भावनिक !

गिरीश : अरे बाबा, बायको जेव्हा क्रोधी स्वभावाची असते आणि तिचे भडके उडायला आपणही कारणीभूत होत

राहतो आणि त्यातच शेवटी जेव्हा तिचा अंत होतो -- अशा आयुष्यात आपलं मन, भावना करपत जाणं असं काही घडत जातंच ! मी वैचारिक असल्याचा अभिमान बाळगणं किंवा तू त्याची हेटाळणी करणं याला काय अर्थ आहे ? ( इथे प्रिय. येऊन उभी. )

प्रिय. : ( गिरीशच्या बायकोच्या आविर्भावात, ओरडत -- ) सारख्या चुका काढायच्या, सारखं बोलायचं, सारखं हिडीसफिडीस करायचं -- कुणाचं डोकं राहील जाग्यावर ?

मंगेश : माझी बायको खूप प्रेमळ होती -- घरचं पाहणं, मुलाला वाढवणं, त्याचं शिक्षण हे सर्वस्वी तिचं कर्तृत्व होतं -- ती अपघातात जाणं हा मला प्रचंड धक्का होता -- तिच्या आठवणींतून मी कधीच बाहेर पडू शकणार नाही --

प्रिय.: ( आता मंगेशच्या पत्नीच्या आविर्भावात -- ) तुम्ही म्हणाल तसं -- कित्ती छान सुचतं तुम्हाला -- कित्ती छान -- ( ती जाते. )

मंगेश : ( क्षणभराने -- ) आणि मी जे वैचारिक -- भावनिक वगैरे बोललो ते वर्म काढण्यासाठी नव्हे -- आपल्या दोघांच्याही आयुष्याकडे हसत पाहण्यासाठी ! आपण एकत्र आहोत -- एकत्र राहू !

गिरीश : ( ग्लासेस भरून झालेले आहेत. ) चीअर्स !

मंगेश : ( त्याचा ग्लास उंचावत -- ) चीअर्स !

गिरीश : आज कोणता सीन घेऊ या ? सगळं काही रिपीट करत राहणं ही आता आपली गरजच झालेली आहे !

मंगेश : तुझा आवडता ! दोन लेखकांमधला !

गिरीश : ओके. सुरू --

मंगेश : ( स्टान्स बदलत -- ) नुसत्या मध्यमवर्गीय आयुष्यातून चांगल्या कलाकृती निर्माण होऊ शकत नाहीत !

गिरीश : का ?

मंगेश : एका मर्यादित चौकटीतल्या घिस्यापिट्या सुखदु:खांतनं कसल्या कलाकृती येणार ?

गिरीश : मला एकजण म्हणत होता की इकडे आपल्याला महायुध्दांचा अनुभव नाही म्हणून आपल्या कलाकृती खुज्या निपजतात ! अरे, म्हटलं मग आपण भाग्यवान आहोत ! चांगल्या कलाकृतींना लागणारी असली भूमी उपलब्ध नसावीच खरं तर कुठंही जगात !

मंगेश : सामाजिक, राजकीय, आर्थिक अन्यायांतून येणारी दु:खं हा आपल्याकडचा त्या मानानं सुपीक एरिया आहे ! नुसतं किरकोळ व्यक्तिगत सुखदु:खांची कौतुकं करत बसणं हा संकुचितपणाच होणार !

गिरीश : व्यक्तिगत नको म्हणूस, ’ व्यक्तिकेंद्री ’ म्हण -- तो आहे वापरातला शब्द ! आणि हो, सामाजिक दु:खांचे प्रकार ! वेश्यांची दु:खं, आदिवासींची दु:खं, दलितांची दु:खं, शेतकऱ्यांची, कामगारांची दु:खं यांच्यांतही अग्रक्रम ठरवता येतात का ते पाह्यला पाहिजे ! म्हणजे, कलेसाठी यांतलं अधिक सुपीक काय – असं ! आणि एवढंही करून युध्दकैद्यांच्या छळापेक्षा हे सगळं कमी सुपीक ठरणार असेल तर प्रॉब्लेमच होणार आहे ! प्रचंड विद्ध्वंसाची अशी युध्दाची पार्श्वभूमी मिळणं याच्याइतकं प्रचंड काय असणार आहे ?

मंगेश : असल्या प्रतवारीची गरज नाही ! व्यक्तिगत सुखदु:खांचं नक्षीकाम हे फारसं महत्त्वाचं असणार नाही इतकंच !

गिरीश : आजाराचं दु:ख, एकाकीपणा, वैफल्य – या गोष्टी नकोतच का ?

मंगेश : त्याही सामाजिक अन्यायातूनच उद्‌भवल्या आहेत, हे दिसलं पाहिजे !

गिरीश : मध्यमवर्गाची दुखं हीसुध्दा सामाजिक अन्यायातूनच उद्‌भवतात असं दाखवता आलं तर ?

मंगेश : तसं असू शकत नाही ! मध्यमवर्ग हा स्वार्थी, संकुचित, असतो ! सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणारा

असतो ! परिवर्तनाला नकार देणारा असतो !

गिरीश : म्हणजे, संकुचित नसलेलं, आणि सदोदित परिवर्तनाला तयार असणारं मन हवं !

मंगेश : मुख्य म्हणजे सामाजिक भान असणारं !

गिरीश : गौतम बुध्द तर राजपुत्र होता ! त्याचं कसलं भान होतं ?

मंगेश : ( चिडून -- ) कलेबद्दल बोलतोय आपण ! त्यात अध्यात्म आणि तत्त्वज्ञान कशाला ?

गिरीश : कलावंत आणि तत्त्वज्ञ यांचं दु:खाचं भान वेगवेगळं असायला पाहिजे ! वा !

मंगेश : दिशा, हेतू वेगवेगळेच असणार नं !

गिरीश : वेगवेगळ्या दिशा, वेगवेगळे हेतू, दु:खांचे वेगवेगळे प्रकार -- असं सगळं कळलं पाहिजे !

मंगेश : गौतमबुध्दानं काय बघितलं ? सुरुवात कुठून झाली ?

गिरीश : म्हातारपण, रोग, मृत्यू !!

मंगेश : विचाराला एक विषय हवा – मर्यादा हवी !

गिरीश : मर्यादा हवी पण संकुचितपणा नको !

मंगेश : जाऊं द्या, थांबू या इथं !

गिरीश : चालेल ! ( काही क्षण जातात. ) मला हीसुध्दा एक उत्सुकता आहे की आपण हे संवाद पुन्हापुन्हा रिपीट का करतो ?

मंगेश : त्या त्या वेळी आपल्याला इंटरेस्टिंग वाटलेलं आपल्याला पुन्हापुन्हा अनुभवावंसं वाटत असेल !

गिरीश : तेच तेच पुन्हा पुन्हा अनुभवण्यात आयुष्य वाया नाही जात ?

मंगेश : हेही आपण पुन्हापुन्हा बोलतो ! निरर्थकतेचीही सवय हवीच ना !

गिरीश : आपल्याला हा एक शापच असेल का काय ? रिपिटिशनचा !?

मंगेश : दुसरं शक्य तरी काय आहे ?

गिरीश : ठीक आहे. मग तर आपली राहिलेली वाक्यं एकदा म्हणून घेऊ. बरेच दिवसांत उजळणी झालेली नाही. आज तू गुरू, मी शिष्य !

मंगेश : तो काय बाबा मोठ्ठा, आम्ही आपले सामान्य !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा पुढारी, आम्ही साधे मतदार !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा बिझिनेसमन, आम्ही बिचारे नोकरदार !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा ग्लॅमरस नट, आम्ही फक्त प्रेक्षक !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा क्रिकेटवीर, आम्ही फक्त बोलघेवडे !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा गुंड, आम्ही फक्त सज्जन !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा शार्पशूटर, आम्ही बोथट घाबरट !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा आयटीवाला, आम्ही इतर काहीही !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो काय बाबा यशस्वी, आम्ही फक्त प्रशंसक !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो हारगुच्छ घेणारा, आम्ही टाळ्या वाजवणारे !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : तो फक्त जिवंत आम्ही सगळे मृतात्मे !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : थोडक्यात तोच सर्व काही, आम्ही मात्र काहीच नाही !

गिरीश : ( तसे म्हणतो. )

मंगेश : ( मूळपदावर येत -- ) बास ! बरं वाटलं !

गिरीश : बास ! बरं वाटलं !

मंगेश : ज्या अर्थी तू माझं शेवटचं वाक्य रिपीट केलंस त्या अर्थी तुझं अभ्यासात लक्ष नव्हतं !

गिरीश : तसं नाही ! मलाही खरंच बरं वाटलं ! सारखं जे म्हणावं म्हणावं वाटत असतं ते एकदा सगळं म्हणून टाकलेलं बरंच असतं !

मंगेश : मन शांत होतं !

गिरीश : तेच !

मंगेश : ( काही क्षणांनी -- ) काय गप्पसा ? कसला विचार करतोयस ?

गिरीश : तात्पुरतं बरं वाटणं वगैरे घडतं रे, पण सालं इच्छा अपुऱ्याच राहतात ! आता पूर्ण झालं, असं काही होत नाही !

मंगेश : यात नवीन काही नाही ! धिस इज कॉमन !

गिरीश : आपण मेल्यावर शरीर जळू शकेल हे मान्य, पण मनही जळून राख होऊ शकेल ? ( इथे झपकन अंधार होतो. क्षणभराने पैंजणांचे आवाज. संथ लयीत चालतानाचे. नंतर ' कहीं दीप जले कहीं दिल ' सूरू होते. प्रकाश पडतो तेव्हा समोर ' दानापूर ' हा रेल्वे स्टेशनवरचा बोर्ड. एखादे बाकडे. प्रिय. प्रवेश करते. तिच्याच पायांत पैंजण आहेत. डोळ्यांभोवती काळी वर्तुळे आणि ओठ लालभडक. तिला तिच्या मागे येणाऱ्याची जाणीव आहे. जणू आपले लक्ष नसल्याप्रमाणे स्वत:शीच गुणगुणत उभी. आता मुकुट. प्रवेश करतो. सेक्सी सॅमचाच वेष. कपाळावर भस्म, गंध, डोळ्यांभोवती काळी वर्तुळे आणि ओठ लालभडक. ती बाकावर बसते. आपल्या हातांच्या नखांकडे पाहात सौम्य गुणगुणत राहते. मुकुट. जरा जवळ येऊन उभा. )

प्रिय.: ( तशीच नखांकडे पाहात -- ) बसा ना !

मुकुट. नाही, हो, हो -- ( जरा अंतर सोडून बसतो. )

प्रिय.: मी तुमची वाटच पाहात होते -- माझी कहाणी तुम्हीच ऐकणार हे ठरलेलंच होतं --

मुकुट.: मीही ओढल्यासारखा बरोब्बर आलोय !

प्रिय.: मी याच गावची रहिवासी. दिसायला सुंदर होते --

मुकुट.: आताही आहात --

प्रिय.: सुंदर आहे की नाही आता ते माहीत नाही पण चाळवण्याची क्षमता वाढलीय एवढंच !

मुकुट.: तेच तर महत्त्वाचं असतं !

प्रिय.: माझं सासरही इथलंच. थोडक्यात म्हणजे माझा दोनदा गर्भपात झाला होता आणि मला तिसऱ्यांदा

दिवस होते. मी म्हणत होते की डॉक्टरला दाखवू या, पण आमच्या घरच्यांचा गंडेदोरे, अंगारेधुपारे आणि मंत्रतंत्र यांच्यावर जास्त विश्वास होता. दोनदा गर्भपात झालेला असल्यामुळं माझ्याबद्दल त्यांना तिरस्कारच होता. तरीही उपकार म्हणून आणि कर्तव्य म्हणून ते तसले उपचार करत होते. मी नुसतीच कंटाळले नव्हते तर घाबरलेलीही होते. पुन्हा तसंच घडणार, असंच मला वाटत होतं. जसजसे महिने उलटत गेले तसतशी माझी भीती वाढत गेली. आता तिसऱ्यांदा ते घडायला नको होतं. वाढत्या भीतीमुळंही ते लौकरच घडायची शक्यता होती. त्यामुळं मी समजून उमजून आयुष्य संपवायचा निर्णय घेतला ! मला जिवंत राहणंच अशक्य झालं होतं ! ( मुकुट.जरा जवळ सरकतो, तिच्या पाठीवर हात ठेवतो. ) असं खरंच बरं वाटतंय ! सहानुभूती आहे जगात !

मुकुट.: तुला असा स्पर्श केल्यानं मी अधिकच मानवी होतोय ।

प्रिय.: मला मूल व्हायला हवं होतं... ( रडू लागते. मुकुट.आणखी जवळ सरकून तिला जवळ घेतो आणि तिच्या पाठीवरून हात फिरवत राहतो. )

मुकुट.: रडू नको -- मी आलोय ना -- विसर ते सासर --

प्रिय.: लोक म्हणतात, शरीरांपासून उचकटून काढलेल्या मनांचं हे जग आहे -- आपल्याच कल्पनेतलं – बहुतेक -- असेल असं ?

मुकुट.: तुलाही आणि मलाही – तुझंही आणि माझंही -- हे खरं की खोटं हे तपासायची गरज काय आहे ? वर्तमानात जगू ! आपल्या भ्रमाशिवाय काही शक्यच नसेल तर आत्ता सुखावह वाटणारा हा भ्रम काय वाईट आहे ?

प्रिय.: तडजोड, जमवून घेणं -- असं नकोय मला आता !

मुकुट.: ते बरोबर आहे. पण, माझंही विचारात घे । वुई हॅव टु लिव्ह !

प्रिय.: लिव्ह ? मग शरीरांविना मनांच्या जगाचं काय ?

मुकुट.: ( सुस्कारत -- ) हं ऽऽ ( तिला आणखी जवळ ओढून घेत -- ) बरोबर आहे तुझं --

प्रिय.: मला समजतंय की फक्त पाठीवर माझं सांत्वन करून तुमचं समाधान होणार नाहीय !

मुकुट.: खरं तर मला संपूर्ण सांत्वन करायचंय -- माझा प्रश्न नाही -- तुला कितपत चालेल एवढाच प्रश्न आहे – कारण तुटण्यापेक्षा तुला चालेल एवढ्या मर्यादेत राहणं मला आवडेल, कारण, माझ्यातही थोडंफार स्किल आहे ! आणि मला आत्मविश्वास आहे !

प्रिय.: आत्मविश्वास असलेली माणसं मला आवडतात !

मुकुट.: प्रश्नच मिटला मग ! सगळं सोप्पंच झालं ! ( तिला आता अगदी मिठीतच घेतो. ) अजून सांग कहाणी !

प्रिय.: जणू काय कहाणी सांगण्यातच मला इंटरेस्ट आहे -- आणि तुमचे सगळे प्रयत्न -- माझी कहाणी नीट ऐकता यावी यासाठीच चाललेयत -- खरंच !

मुकुट.: तुझ्यात खरंच चाळवण्याची क्षमता आहे ! आणि नाही तरी नुसतंच सुंदर असण्याचं महत्त्व तरी काय ?

प्रिय.: माझं कामच झालं !

मुकुट.: म्हणजे काय ? माझं पूर्ण व्हायच्या आधीच ?

प्रिय.: सगळं फुटून बाहेर पडणं हा शरीराचा भाग आहे -- मनाचं काय अपूर्ण आहे ?

मुकुट.: स्त्रीशरीर कुस्करणं, वेदनामय करणं ! त्या स्त्रीच्या मनात मी सतत असणं !

प्रिय.: म्हणजे नुसतं मूल जन्माला घालणं हेच काही स्त्रीचं काम नाही --

मुकुट.: पुरुषाला जन्माला घालणंही आहे --

प्रिय.: आणि नंतर ?

मुकुट.: नंतर ?

प्रिय.: एका एका शब्दानं वाढत जातो ना वेग हृदयाच्या ठोक्यांचा ? बेभान ?

मुकुट.: शेवटी घडणं सगळं महत्त्वाचं ! त्यासाठी शब्दही महत्त्वाचे !

प्रिय.: पुरुषाचं आकर्षण आणि तिटकारा -- दोन्हीही आहेत माझ्यात !

मुकुट. मी दोन्हीलाही बळी पडायला तयार आहे ! काहीही होवो !

प्रिय. : करा मग आणखी तीव्र सांत्वन ! ( मुकुट. तिला आवळून आणखी जवळ घेत असतानाच अचानक जणू त्याला मार बसू लागतो. )

मुकुट.: ओऽय ... ओऽय ... ( आणखी जोरात मार बसतो. तो पळून जातो. )

प्रिय.: लव्हगुरू म्हणे ! समतेचं राज्य असतं तर तुझं हे सगळं असं घडलं नसतं, असं सांगणारे मला भेटले -- मला माणूसच माहीत असल्यामुळं मी ते सगळं हसून सोडून दिलं ! ( एका बाजूने मंगेश आणि दुसऱ्या बाजूने गिरीश येतात. त्यांच्याही डोळ्यांभोवती काळी वर्तुळे, ओठ लालभडक. दोघांच्याही हालचालींत लालसा. )

गिरीश : ( मंगेशकडे पाहात -- ) च्यायला इथंही तू आहेसच ! आपण एकत्रच च्यायला सगळीकडे !

मंगेश : हेच वाक्य मी म्हणू इच्छित होतो ! पण हे मनांचं जग असल्यामुळं तुझं पाहून मी पोपटपंची केली असं तू म्हणू शकला असतास ! किंवा तुझ्या मनाची घोकंपट्टी !

गिरीश : पोपटपंची ! घोकंपट्टी ! अर्थ सांग, चल --

मंगेश : तूच सांग –

गिरीश : अर्थ -- सांगितला की मर्यादित होतो आणि मरतो ! आयुष्यात तुझा कधीच कलेशी संबंध आला नाही, त्यामुळं तुला हे कळणार नाही ! तरीही -- पोपटपंची म्हणजे न समजता एखादी गोष्ट वारंवार रिपीट करत राहणं ! घोकंपट्टी तरी तुला कळत असेल, असं समजतो ! आपलं मन आहे तेच राखण्यासाठी करावी लागते ती – मन सतत घुमवत राहणं --

मंगेश : हं हं ! दॅट आय नो ! ( गिरीशचे प्रिय. कडे लक्षं जाते. )

गिरीश : च्यायला आलो कशासाठी -- कोणतं स्वप्न घेऊन -- आणि इथं परत तीच ! तीच दिसतेय ! ( जवळ जाऊन पाहतो. ) शंकाच नाही !

प्रिय. बसा नं !

गिरीश : ( स्वगत -- ) एवढी प्रेमळ ? माझी पत्नी ? स्वप्न साकार होणार की काय ?

प्रिय. कोणतं स्वप्न ? -- इथं स्वगतंही सगळ्यांना ऐकू येतात !

गिरीश : च्यायला ! बरं, तू अधिक कुरूप झालीयस हे एक वेळ समजू शकेल पण तुझ्यात हा प्रेमळपणा कुठला आला ?

मंगेश : ( स्वगत -- ) याच्या बोलण्यावरून ही ती नसावी -- मी शोधतोय ती ही नव्हे -- ( एका बाजूने त्याला पैंजणांचा आवाज येतो. ' कहीं दीप जले कहीं दिल ' ऐकू येत असतानाच तो त्या दिशेने जातो. प्रिय. हसते. )

गिरीश : का ? हसलीस का ? माझ्या प्रश्नाला हसलीस ?

प्रिय.: तुझ्या मित्राचं स्वगत ऐकलं ! एका वेळी अनेक ठिकाणी काम करण्याची संधी आलीय आज ! त्याची मजा वाटली !

गिरीश : लग्नानंतर आपली काही वर्षं बरी गेली. नंतर हळूहळू तुझा क्रोधिष्ट स्वभाव तीव्र होत गेला. जगणं

मुश्किल होईल इतका. घटस्फोटाचं माझ्या मनातही आलं आणि इतर काहींनीही सुचवलं. पण तो विषयही काढला असता तर शेवटची घटना तेव्हाच घडली असती. शिवाय आपल्या मुलाच्या जीवनात उलथापालथ करावी का, हाही प्रश्न होता. आणि तुझ्या वाढत्या क्रोधिष्टपणाला मीही थोडाफार जबाबदार असण्याची शक्यता मान्यच होती मला. कारण, तुझ्या भडकत्या मनस्थितीला प्रेमाच्या फुंकरीनं आवर घालायचा प्रयत्न करण्याऐवजी मीही चिडत गेलो आणि दुरावत गेलो तुझ्यापासून. त्यामुळं, तुझी मनस्थिती अधिकच बिघडत गेली. तुझ्या मनाची तर वाट लागत गेलीच पण माझंही मन करपत गेलं. सगळ्याचा शेवट तुझ्या मृत्यूनं झाला ! खोटं नाही बोलत, शांत वाटलं ! मस्त ! तुझ्या मृत्यूनंतर ! शांत वाटलं ! शिक्षा संपवून जणू तुरुंगातून बाहेर पडलो होतो !

प्रिय.: तुमच्या प्रामाणिकपणानं खरंच मी भारावून गेलेय ! पण सुरुवातीला मी प्रेमळ वाटले तुम्हाला ? सॉरी ! इथं शरीराच्या कटकटी नसल्यानं आकर्षणशक्ती वाढलीय माझी ! पण मला इथं पाहून दचकलातसे ? मग कोण असायला हवं होतं इथं ?

गिरीश : नाही म्हणजे -- अमुकच असं नाही -- उलट -- ( त्याला मार बसू लागतो. ती तशीच. तिच्या चेहऱ्यावर स्मित. ) ओऽय ओऽय -- ( तो पडतो. उठतो. धडपडतो. पळून जातो. )

प्रिय. सगळेच हलकट ! वेगळी स्त्री शोधतोय ! ( आता मंगेश तसाच मार खात असल्यासारखा धडपडत येतो. ) प्रेमळपणात मश्गूल होता नाही का ? का ? जे हवं ते मिळत होतं म्हणूनच ना ? तुला महत्त्वाची वाटणारी एखादी गोष्ट नसती मिळाली तिच्याकडून तर ? माझं काय झालं हे माहिती तरी आहे का ? प्रेमळपणाची चंगळ चालली होती तुमची ! वा रे वा ! अजूनही त्याच आठवणी काढत मजेत तेच चाललंय ! आणि तीच सुखं लाईव्ह मिळाली पुन्हा, तर हवीच आहेत ! माझ्याबद्दल तुम्ही पूर्ण बेफिकीर होतात ! मग्न नुसते स्वत:च्या सुखात ! आणि आता पुन्हा तीच तशीच स्त्री हवी आहे ! अं ! तुमच्यासारख्यांचा तर मला जास्तच संताप आहे ! घे ! ( त्याला आणखी मार बसू लागतो. तो ' ओऽय ओय ' करत पडतो. दोन बाजूंनी गिरीश आणि मुकुट. तसेच मार खात येतात. पडतात. ती सस्मित. क्षणभराने -- ) – माझी ही इच्छा रिपीट करत राह्यचीय मला – एकेका पुरुषाला हाणणं -- ( तिघेही मार खात धडपडत राहतात. ) कुणालाच गत्यंतरच नाही -- मग हे माझं ! -- माझंही !

मंगेश : ( मधेच उसंत मिळवून -- ) असंच असणार आहे तर आमचा दोष काय आहे मग ?

गिरीश : शिक्षा कशासाठी ?

मुकुट.: स्वत:हून का आलो आम्ही इथे ?

प्रिय.: माझ्याकडे कुठायत उत्तरं ? माझ्याकडेही प्रश्नच आहेत ! मी तरी का भोगतेय हे नरकयातना जोपासण्याचं आणि पसरवण्याचं जगणं ? जाऊं दे -- नकोतच उत्तरं ! ( पुन्हा त्या तिघांना मार बसू लागतो. तिघेही धडपडतात, हेलपाटतात. मूक हालचाली. प्रिय. उभी. सावकाशपणे एका बाजूला निघून जाते. तिच्या पैंजणांचे आवाज... नंतर ' कहीं दीप जले... '
प्रकाश मंद होत जाताना पडदा पडत जातो ... )

**-- अंक पहिला समाप्त --**

**-- अंक दुसरा --**

( पहिला अंक संपला तिथून पुढे दहा वर्षे उलटून गेलेली आहेत. हे एक आभास-दृश्य आहे. पडदा उघडतो तेव्हा समोर गिरीश भाजी निवडत बसलेला. गिरीशच्या हातात सिगरेट. मधूनच झुरका मारतो. मग स्वत:शीच गाणे गुणगुणू लागतो -- )

गिरीश : जिंदगी ख्वाब है
ख्वाबमे झूठ क्या
और भला सच है क्या ...
( गद्यात -- ) सब सच है -- का काय -- सब झूठ है -- काय, मुळात काय आहे -- काही आठवत नाही, च्यायला -- ( मंगेशचा फोन वाजतो -- पुढे मंगेशचा नुसता आवाज -- )

मंगेश : ( फोनवर -- ) एकदम ठीक आहे -- मजेत -- नाही रे -- आठवणी नाही काढत बसत -- नको बाबा, तुझ्याकडे नको यायला सांगूस -- तुम्हीच येत राहा जमेल तेव्हा -- आता बरीच वर्षं झाली रे -- आठवणी नाही काढत -- आणि हा गिरीशकाका आहे ना -- तोही नाही काढत कुणाच्या आठवणी -- उलट मला तो योग्य ते तत्त्वज्ञानही सांगतो -- जगण्याबद्दल ! -- मराठीचा प्राध्यापक होता ना -- मराठीवाला तत्त्वज्ञानातलाही तज्ञ असतोच आपोआप -- गंमत रे -- नाही, चिडणार नाही तो -- तुला माहितीच आहे की -- मस्त, हसत-खेळत चालतं आमचं ! काही काळजी नको -- तुम्ही ठीक आहात ना सगळे ? हं, मग ठीक -- ठेवतोस ? बरं, चल -- मजेत राहा सगळे -- ( फोन संपतो. तेवढ्यात गिरीशचा फोन वाजतो. उठून जाऊन तो फोन घेतो.)

गिरीश : काय रूटीन आहे च्यायला ! तुझा झाला की लगेच माझा ! ( फोनवर -- ) अरे, मजेत आहे -- मंगेश काकाही मजेत आहेत -- अरे, तो तर म्हणतो की तो मेला तरी मी इथेच राहायचं ! गंमत रे -- नाही, चिडत नाही तो ! त्याचा प्रॉब्लेम एकच आहे -- त्याला वाटतं की काही वर्षांपूर्वी तो केमिस्ट्री शिकवत होता तेव्हा त्याला तो विषय येत होता -- आता ते विसरत चाललेय म्हणतो ! अरे म्हटलं केमिस्ट्रीच्या ऐवजी माझ्या मराठीत ये ! तर तो कवितांना घाबरतो ! नाही, बाकी उत्तम आहे ! तिकडे नको बाबा ! इथे लोक भेटतात, मी लिहिलेलं इकडंतिकडं छापलं जातं -- छान वाटतं ! तब्येत उत्तम आहे ! ठीक -- ठेवतोस ? ठेव -- तुम्हीही राहा चांगले -- हो, ठेव -- ( हळूहळू भासातून बाहेर येतो -- ) कुठाय ? मंगेश ? मंगेश तर कधीच गेला -- मग --- ( बेल वाजते. ) या, या. आत या. दार उघडंच आहे. ( मंगेशचे काम करणारा नटच आता मुकुटराव म्हणून प्रवेश करतो. पोषाख साधा. सवयीचा. प्राध्यापकी. ) अरे वा, या,या टणुकमाठ -- या !

मंगेश : मी टणुकमाठ नाही -- मुकुटराव ! आपण भेटलो होतो पूर्वी ! तुम्ही आणि तुमचे एक मित्र -- एकत्र असायचात तुम्ही !

गिरीश : तो मंगेश ! गेला तो ! तुम्ही मंगेश नाही ! ओळखलं मी ! तो गेला तेव्हा त्याचा मुलगा आला होता – म्हणाला -- काका, तुम्हाला राह्यचं तेवढं राहा इथे -- काहीच प्रश्न नाही -- अर्थ समजला ? हे मी तुम्हाला विचारतोय --

मंगेश : समजला समजला --

गिरीश : नीट नाही समजला -- मी त्याचा अर्थ असा घेतला की -- ' राह्यचं तेवढं ' म्हणजे या जगात राह्यचं तेवढं -- आणि ' राहा इथे ' म्हणजे राहा या फ्लॅटमध्ये --

मंगेश : म्हणजे पर्मनंटच काम झालं ! --

गिरीश : पर्मनंट कुठं ? पर्मनंट काय असतं ?

मंगेश : तसं नव्हे -- जिवंत असेपर्यंत म्हणजे पर्मनंटच की !

गिरीश : तुम्ही दिसता बाकी माझ्या मित्रासारखेच ! तुम्ही तो नाही हे ओळखलंय म्हणा मी ! मंगेश ! गेला बिचारा ! हायस्ट्रंग होता जरा ! असल्या लोकांनी हार्टअॅटॅकनं मरणं सवयीचंच झालंय सगळ्यांच्या !

मंगेश : अच्छा, म्हणजे असा झाला शेवट ! मी मुकुटराव ! मग याच पध्दतीनं तुमचा आणि माझा शेवट कसा होईल ते सांगा बरं ! -- म्हणजे आपले स्वभाव लक्षात घेऊन --

गिरीश : सोपं आहे ! मी -- ब्रेन हॅमरेजनं आणि तुम्ही -- फुफ्फुसाच्या कॅन्सरनं ! मुकुटराव असाल तर ! आणि सॅम !

मंगेश : अहो, विचारलं म्हणजे काय सांगूनच टाकताय का काय बिंधास्त --

गिरीश : आता घाबरायचं नाही टणुकमाठ -- तयार राह्यचं -- माझा मित्र मला खूप हवाहवासा होता -- आणि मीही त्याला -- बहुतेक -- पण आम्ही धरून ठेवू शकलो का एकमेकांना -- नाही -- तसंच हे जगही आपण धरून ठेवू शकत नाही -- लोक असं -- ही अमुक एक माझी इतक्या वर्षांची लकी वस्तू आहे -- किंवा ही वडिलोपार्जित आहे -- वगैरे म्हणतात ना तेव्हा हे त्यांच्या ध्यानात येत नाही --

मंगेश : पर्मनंटच धरून चाललात ते सगळं !

गिरीश : तुम्ही राहता का इथं ? एकत्र राहू. तुम्ही मंगेश नाही ! हे नक्कीच !

मंगेश : तुम्ही मला टणुकमाठ न म्हणता सरळ मुकुटराव म्हणत असलात तर विचार करीन -- राव पण नको – नुसतं मुकुट चालेल --

गिरीश : नावही सोडून द्यावं लागतं शेवटी -- मग ते नाव अमिताभ बच्चन का असेना -- किंवा जॉर्ज बुश किंवा पुतिन किंवा ट्रंप --

मंगेश : ते समजतं हो सगळ्यांना -- पण जिवंत असताना चुकीचं नाव नाही चालत -- तुम्हाला चालेल का गिरीशच्या ऐवजी राकेश ? -- किंवा शिरीष ? साम्य असलं तरी शिरीषही नाही चालणार !

गिरीश : आता कुठं करत बसता प्रयोग ? ! पण केले पाहिजेत बरं का प्रयोग ! पण तुम्ही बिनमंगेश कसे ?

मंगेश : इथं जमतंय बघा आपलं ! दोन विरोधी गोष्टी एकाच वेळी पटणं ! आणि महत्त्वाच्या वाटणं ! प्रयोग हवा आणि प्रयोग नको ! मी बिनमंगेश नाही ! मुकुट ! मुकुट आहे मी !

गिरीश : ओके ! बघा मग ! राहताय का ? पण तुमच्या त्या दोन बायका -- त्यांना कुठं सोडणार ?

मंगेश : नाही, तो नाहीय आता प्रश्न ! -- विशेष म्हणजे नंतरची आधी गेली ! आम्ही लग्न करू शकलो नाही तरी काय, दर्जा बायकोचाच होता तिचा माझ्या आयुष्यात ! आणि मी तर तिचा एकमेव पती ! लोक तिला म्हणायचे हा वयस्कर नवरा किती दिवस पुरणार तुला ?! पण काय झालं ? ती असेपर्यंत फुल स्विंगमध्येच होतो ना मी ! तिलाही दोन मुलं झाली ! आता माणसाला ब्लडकॅन्सर कसा होतो -- म्हणजे कशामुळं -- वगैरे मला नाही समजत -- पण त्यानं गेली ती ! -- म्हणजे तिला आतनं जाणीवच तर नसेल याची ? म्हणून तर तिनं -- माझ्यासारख्या --

गिरीश : असे भावनेच्या आहारी नका जाऊ -- झालं ते झालं -- होती तोपर्यंत मजेत गेले ना दिवस ? -- दोघांचेही ? -- झालं तर मग ! आता फार विचार नका करू ! म्हणजे -- भावना नका करू ! चांगली होती ती ! भाग्यवानच तुम्ही ! ते जाऊं द्या ! दुसरीचं काय ?

मंगेश : घटस्फोट झालेलाच नव्हता ना ! तीही होतीच ! पण ही गेल्यावर माझ्या दु:खात सहभागी व्हायला

आली ! हिंदू स्त्री ! मलाही पुन्हा तिच्याबद्दल आदर वाटायला लागला ! म्हणजे प्रेमच ! हिची तर आठवण जात नाही आणि तिचं तर प्रेम पुन्हा सुरू झालेलं ! तिचं याला काही ऑब्जेक्शन नव्हतं ! म्हणजे आठवणीला -- आम्ही पुन्हा एकत्र आलो ! गेलेलीची आठवण मनात जागी ठेवून मी जुनीवर प्रेम करायला लागलो !

गिरीश : तुमचं लाईफच एकूणात मला बरंचसं कॉम्प्लिकेटेड दिसतंय ! पण मग काय, तरीही मजा येत राहिली ?

मंगेश : मी काय मनात ठेवून काय करतोय हे जुनीला कळतच नव्हतं ना ! आणि त्याच्या पुढचं सांगतो ! नो डाऊट अबाऊट इट ! कळलं असतं तरी दुर्लक्ष करायला ती तयार होती ! किंवा करतही असेल तसंच ! हू नोज !

गिरीश : लहान गावात राहून माझ्या माझ्या अनुभवातून शोधून काढलेल्या माझ्या थिअरीला सपोर्टिंगच बोलताय तुम्ही !

मंगेश : म्हणजे ?

गिरीश : स्त्री आणि पुरुष यांच्या मेंदूचा वापर करण्याच्या पध्दती वेगळ्याच असतात -- ही ती थिअरी !

मंगेश : तुम्ही मांडलं नाही हे कुठे ?

गिरीश : कुठंतरी कुणीतरी हे आधीच मांडलं असेल, म्हणून मी गप्प बसलो !

मंगेश : हं ! ते आहे म्हणा !

गिरीश : काही मांडायचं म्हटलं ना की आधीच हे कुणी मांडलेलं नाही ना, हे नक्की माहीत असण्यासाठी बराच अभ्यास असावा लागतो हो !

मंगेश : आपल्याकडे सोयीही नसतात तशा ! पुस्तकं मिळवणे, रोजच्या व्यावहारिक कटकटी सांभाळत त्यांचा अभ्यास करणे -- हे जरा अवघडच जातं आपल्याकडे ! लोक या प्रकाराला मध्यमवर्गीय म्हणून हिणवतात ! अभ्यासाला ! पण हीही गोष्ट चालू राह्यला नकोय का समाजात ? जमेल तशी का असेना ? परदेशात तुम्ही सांगितलं, अमुक लेखक हवाय, की पैसे द्या, त्याची ओळन् ओळ तुम्हाला घरपोच मिळते -- आणि त्याच्यावर जे जे काय लिहिलं गेलंय तेही --

गिरीश : बोंबलत जाऊं दे सगळं ! दचकू नका असे ! उभे का राहताय, बसा ना ! एकूणात अॅव्हेलेबल परिस्थितीत --

मंगेश : तुम्ही कम्युनिस्ट आहात ?

गिरीश : नाही ! का ?

मंगेश : परिस्थितीवर भर दिलात म्हणून विचारलं !

गिरीश : मग बरोबर आहे ! इथंही आपलं जमलं ! राहताय का इथं ? मुकुटराव ? जुन्या, पहिल्या बायकोचं काय ?

मंगेश : ती नंतर गेली !

गिरीश : तिला कसला कॅन्सर झाला ?

मंगेश : कॅन्सर नाही झाला, उचक्या झाल्या ! म्हणजे उचक्या थांबेचनात म्हणून अॅडमिट केलं -- पुढं काय काय झालं ते सगळं मला काही कळलं नाही -- पण, गेली ! आता याच्यात डॉक्टरांची काही चूक होती का वगैरे विचार मी अक्षरश: फेकूनच दिले ! सग्गळं प्लेझर दिलं हो तिनं, पण गेली. ओके !

गिरीश : धिस इज द ट्रुथ ! व्यक्तिकेंद्रित ! याला दोष कसा म्हणता येईल ?

मंगेश : असंच तर असतं लाईफ --

गिरीश : तर दुसरीही गेलीय ! राहू या आपण एकत्र !

मंगेश : तुम्ही त्यातला पॉझिटिव्ह भाग पाहताय, पण आय ॲम विदाऊट सेक्स ! याचं काय ?

गिरीश : माझंही तेच आहे, फक्त समज-पर्सेंटेज आपलं वेगवेगळं आहे । त्यामुळं, आपली सहनशक्तीही वेगवेगळी आहे ! एवढंच !

मंगेश : सहनशक्ती वेगवेगळी असण्याला तुम्ही ' एवढंच ' म्हणताय ?

गिरीश : तुम्हालाही मंगेशसारखंच टक्कल आहे -- बट यू आर डिफरंट ! डिफरंट !

मंगेश : मुख्य म्हणजे मुलं लहान आहेत -- नंतरचीची -- म्हणजे आधी गेलेलीची -- त्यामुळं शक्य नाही – उलट मीच, मुलं सांभाळायला कुणी मिळतेय का ते पाहतोय --

गिरीश : म्हणजे आता तिसरी ?

मंगेश : प्रयत्न करायचा हो -- पण खरं सांगतो, मला गिल्टी वाटतं बरं का -- म्हणजे दुसरी गेल्यावर पाहिलीचा मी फायदा घेतला -- योग्य नव्हतं ते --

गिरीश : काही काही गिल्ट असं कायमचं राहतं मनात -- कॉमनरूममध्ये मी जिथे बसायचो तिथून सहज जरी बाहेर लक्ष गेलं तरी एका घराची खिडकी दिसायची -- व्हायचंच असं -- तर त्या घरातल्या बाईला आला संशय की मला तिच्याबद्दलच -- आणि तिनं त्या खिडकीचा पडदा कायमचा बंद ठेवायची पध्दत पाडली ! ते आठवलं की अजूनही गिल्टी वाटतं ! असलं काही काही पुसूनच टाकता आलं पाहिजे -- कॉमन रूम तशी बरीच मोठी असूनही त्याच ठिकाणी बसायची सवय मलाही मोडता आली असती --

मंगेश : पण नव्हतं ना तसं काही मनात --- मग --

गिरीश : पण दुसऱ्यानं तेच गृहीत धरलं ना -- म्हणजे तेही एक सत्य झालंच ! आणि ती बाईही दिसायचीच की कधीकधी --

मंगेश : म्हणजे असूही शकेल मनात -- असं वाटतंय का --

गिरीश : नाही आपलं एक सांगतोय -- गिल्टवरनं निघालं हे -- मनात एका ठिकाणी दबून बसूनच राहतं सालं ते !

मंगेश : तुमचे मित्र नाहीत तर अगदी एकटं वाटत असेल आता ?

गिरीश : तर !

मंगेश : त्या वेळी तुम्हाला ब्रेकिंग न्यूजची खूप आवड होती ! --

गिरीश : हे तुम्हाला कसं माहीत असा विचार आला डोक्यात पण हल्ली बरंचसं मी तसंच सोडून देतो ! तर, बदल होतो हो माणसात ! तोच तसाच नाही राहात तो ! गौतम बुध्द तर म्हणतो की काहीच पर्मनंट नाही -- सगळं सारखं बदलतंय -- च्यायला, पण विचार केला तर फारसा बदल नाही जाणवत --

मंगेश : नाही कसं ? ब्रेकिंग न्यूजचं तर व्यवसनच होतं की तुम्हाला ! आता एवढ्या वेळात तर काहीच दिसलं नाही ते !

गिरीश : सोडलं ! सोडलं हं ते ! आणि ब्रेकिंग न्यूज सोडली म्हणजे कशी ? लोक काय करतात, मी तंबाखू सोडली, मी तंबाखू सोडली -- असं म्हणत मानसिकदृष्ट्या सोडतच नाहीत तंबाखू ! -- माझं तसं नाही -- मी ब्रेकिंग न्यूज इतकी सोडलीय -- मनानंसुध्दा, बरं का -- की वाटल्यास मधनंमधनं पाहतो सुध्दा ! -- हा काय टीव्ही आहेच की ! सोडायचं पण मनानं धरून ठेवायचं -- मग काय अर्थ आहे ?

मंगेश : ग्रेट ! सेक्सबाबतची सवय मलाही सोडायचीय ! ही तुमचीच पध्दत मला सुटेबल वाटतेय ! इतकं सोडायचं की वाटल्यास करायचंसुध्दा ! वा !

गिरीश : मी थोडंसं फिलॉसॉफिक लेव्हलचं बोलत होतो तर तुम्ही त्याचा संधीसाधूपणा केलात !

मंगेश : नाही नाही, फिलॉसॉफिक चालतं नं मला ! मीही तीच लेव्हल गाठू इच्छितो ! फिलॉसॉफिक म्हणजे

काहीतरी इर्रेलेव्हन्ट, फालतू, निरुपयोगी असं समजायला मी काय आताच्या जनरेशनचा थोडाच आहे ? की परिवर्तनवादी आहे ?

गिरीश : तुम्ही तर त्यांचे बाप आहात ! म्हणजे आताच्या जनरेशनचे ! उगीच नाही, त्यातले बरेच तुमचे भक्त झालेले ! मिस्टर -- लव्हगुरू !

मंगेश : मीही प्राध्यापक होतोच, पण, निरर्थक बोलण्यात माझी प्रगती तशी कमीच झाली ! त्या बाबतीत मला बॅकबेंचरच म्हणावं लागेल ! म्हणून फिलॉसॉफीत मी जरा मागं आहे असं वाटतं, इतकंच !

गिरीश : हा काय टोमणा समजू का ?

मंगेश : ती मुलं मला जो समजतात तो मी नाही, पण, त्यांचा फायदा घेणं मला भाग आहे ! जाऊं दे ! आपण भेटत जाऊ, पण, गैरसमज करून घ्यायचे नाहीत असं एक अॅग्रीमेंटच करू ! म्हणजे मी टोमणा मारतोय का, वगैरे ! आणि निरर्थक बोलणं म्हणजे कमी प्रतीचं असं समजायला मी काही एखादा मोठा विचारवंत नाही. किंवा नुसता व्यवहारवादीही नाही !

गिरीश : तरीही, हल्ली बऱ्याचजणांना वाटतं त्याप्रमाणे, फिलॉसॉफीचा काही उपयोग नाही असं वाटणं किंवा खरं तर ' समजणं ' म्हणू -- ही मानवजातीची प्रगती तर नसेल ? -- अशीसुध्दा एक शंका येतेच हो, आपली आणि त्यांची तुलना केली तर !

मंगेश : इतक्या टोकाला मी नाही जाऊ शकत ! कदाचित, माझी शक्ती कमी पडत असेल !

गिरीश : तुम्ही काय, नम्रपणाची सवय लावून घेतलीय काय ? का, बोलण्यातला धूर्तपणा करताय ?

मंगेश : माणूस कसाही वागला, बोलला तरी त्याच्यावर काहीही आरोप करता येतो, एवढाच तुमच्या बोलण्याचा अर्थ ! ( बेल वाजते. )

गिरीश : या, या ! दार उघडंच आहे ! --

मुकुट : ( नुसता आवाज -- ) मी, तुझा मित्र मंगेश याचा आत्मा ! आधी नुसता आवाज सोडलाय ! येऊ का ?

गिरीश : अरे मंगेश ! ये, ये ! माझा भुताखेतांवर विश्वास नाही -- पण तू ये ! ( मुकुटराव प्रवेश करतो. ) हे बरोबर नाही वाटत, काहीतरी गोंधळ दिसतोय ! तूच टणुकमाठ तर नाहीस ? आणि हा तुझं भूत ?

मुकुट : मी मंगेशच आहे ! सार्त्र नामक एक लेखक होऊन गेला -- त्यानं ' चिप्स आर डाऊन ' नावाची कादंबरी लिहिली होती -- किंवा स्क्रीनप्ले असेल बहुतेक -- त्यात मृतात्म्यांचं जग होतं -- तिथूनच मी आलोय -- सार्त्रनं अंधश्रध्दा जोपासली असं नका म्हणू यडपटांनो -- तो काय व्यक्त करू इच्छित होता ते बघा --

मंगेश : म्हणजे ?

मुकुट : मी आणि प्रियदर्शिनी त्या जगात भेटलो -- आणि आम्हाला असं वाटलं की आपण जिवंत असताना जवळ आलो असतो तर आपण एकमेकांवर प्रेम केलं असतं ! -- असं वाटलं तर, त्या जगाच्या नियमाप्रमाणे, त्या दोन व्यक्तींना पुन्हा एकदा जगायची संधी मिळते -- नुसती संधीच नाही, तर भेटही होते, ते जवळही येतात आणि प्रेमही करता येतं --

गिरीश : मराठीतल्या बुद्धिवाद्यांना सार्त्र समजणं शक्यच नाही ! मृतात्म्यांचं जग, नरक, देवांचा राजा झूस हे पात्र -- अशा गोष्टी त्याच्या नाटकांत आहेत -- त्या त्यांना कळणंच शक्य नाही !

मुकुट : तर, माझी आणि प्रियदर्शिनीची तिथं भेट झाली ! आणि आम्हाला असं वाटलं की जिवंत असताना आपण जवळ आलो असतो तर आपण एकमेकांवर प्रेम केलं असतं ! आणि असं वाटलं, त्यामुळं, त्या जगाच्या नियमाप्रमाणे आम्हाला पुन्हा एकदा जगायची संधी मिळाली ! मी आता आत्माबित्मा नाही, प्रत्यक्षच आलोय ! मंगेश ! आधी मी 'आत्मा ' म्हणालो ते तू घाबरू नयेस म्हणून !

गिरीश : उलट ' आत्मा ' म्हटल्यावरच घाबरायची पद्धत असते ! मला एकट्याला आहे तसा कायम ठेवून बाकी सगळं बदलण्याचा हा काय डाव चाललाय ?

मुकुट : मी प्रत्यक्ष आलोय वेड्या, दारू काढ !

गिरीश : ( मंगेशला -- ) टणुकमाठ, तुम्ही ?

मंगेश : कुठलीही चालेल ! ब्रँडच्या सवयीत मी अडकलोच नाही कधी ! कुठल्याच !

गिरीश : ( मुकुटकडे पाहात -- ) म्हणजे, आता तीही येणार आहे की काय ? इथं ?

मुकुट : यस ! तिचाही भर ग्लास ! नो बंधन !

गिरीश : मंगेश !

मुकुट : आता मी नुसताच तुला माहीत असलेला मंगेश नाही !

गिरीश : मग कुणाचा आत्मा आहेस तू ?

मुकुट : मी आत्मा नाही, मंगेशच आहे ! पण जरा वेगळा ! ती इथं येणार, मी तिच्या प्रेमात पडणार आणि पुन्हा एकदा जगायचा प्रयत्न करणार ! वेगळं ! एकाच बायकोच्या प्रेमात, तेच प्रेम वागवत, ती गेली तरी, त्याच प्रेमात डुंबत बसायचं -- हे माझं कॅरॅक्टर बदलणार !

गिरीश : मला अमिताभ आणि मनोजचा ' अक्स ' सिनेमा आठवतोय ! तुम्ही दोघांनीही एकमेकांच्या काही लकबी आत्मसात केल्यायत खऱ्या ! पण फार प्रॉब्लेम येईलसं वाटत नाही -- तसं पाहिलं तर -- तर तिला पुन्हा प्राध्यापक मुकुटरावच भेटणार आहेत ! स्वतःच्या रूपात -- मंगेश म्हणून !

मुकुट : पण तिचं कॅरॅक्टरही बदललेलं असेल ! माझ्या रूपात, ती आता वेगळ्याच पुरुषावर प्रेम करेल !

गिरीश : ती आहे हुशार ! कुठल्याही गोष्टीचं बिनतोड समर्थन करू शकेल ती ! नैतिक आणि सामाजिकसुध्दा ! फक्त मला एकच कळत नाहीय की मंगेश आणि मुकुट यांच्यांत अदलाबदल का व्हावी ? आणि मी आहे तोच का राहावा ?

मुकुट : कदाचित बदल महत्त्वाचा नसेलच !

गिरीश : पण, आपल्या आपल्यांत बोलतो मीही, सारखा उल्लेख यायचा म्हणून हे सार्त्रबित्र वाचलं बरं का, पण कधी सांगितलं नाही कुणाला, कारण समजेल तेवढं समजेल या पध्दतीनं वाचलं -- खास अभ्यास करून मला झालेलं आकलन -- इथपर्यंत गेलोच नाही; त्याची खंतही नाही ! आणि समजा खूप गुंताड्याची असली एखादी आकलनाची पध्दत, तरीही, काळाच्या ओघात, आता, ती नाकारलीही जाऊ शकेल, कारण, एवढं सगळं समजून घेण्याचं महत्त्वच वाटणार नाही ! यालाच प्रगती म्हणायचं का काय ? आणि का म्हणू नये ?

मुकुट : अजूनही, अॅक्चुअल प्रेम घडणार आहे आमच्या आयुष्यात ! स्त्रीपुरुष म्हणून ! नुसतं तत्त्वज्ञान नकोय ! नकोय ! समजलं ? !

मंगेश : हे काय चाललंय ? आता माझं कुणीच नाही ?

गिरीश : राहता का इथं ? विचार करा ! मुलांची काहीतरी सोय लावून टाका ! आपण एकत्र राहू ! आणि थोडेफार फरक असले तरी समदु:खी म्हणून जगू ! स्त्रीचा अभाव या अर्थी ! ते जाणवणं खूप वेगवेगळं असलं तरी ! आपलं !

मुकुट : पण, मी आता मुकुट नाही याचा पुनारुच्चार नको ! मी मंगेश आहे ही आता स्वतंत्रपणेच एक खरी गोष्ट आहे !

गिरीश : आणि माझ्या अंवतीभंवतीचं सगळं असं बदलल्यावर मी तरी तोच तसाच कसा राहणार ? मला टिकायचं असेल तर डावपेच करावेच लागतील ! पोझेसचे !

मंगेश : डावपेच ?

मुकुट : डावपेच ? कशाला ?

गिरीश ( हसून -- ) वाट लागणार आहे तुमची -- तुम्ही थोडाफार तरी कलेशी संबंध ठेवायला हवा होता – तुमचे मेंदू की आत्मे बदलल्यामुळे पुन्हा तुमची शरीरं एकमेकांसारखी होणार आणि तुम्ही मूळपदावर येणार -- नाटकाचं नाव तुम्हाला सांगून काही उपयोगच नाही -- कवीचा पैलवान आणि पैलवानाचा कवी होणार -- पुन्हा -- मेंदूसारखंच शरीर असणार ! -- आख्खं हस्तरेषाशास्त्र या तत्त्वावरच आधारित असतं ! --

मुकुट : नाही, नाही म्हणता, इकडचं तिकडचं, किरकोळ किरकोळ बरंच साठवलंयस की मेंदूत ! भाषेच्या लोकांना वाचन जरा ठेवावंच लागतं पण ! बऱ्यापैकी !

गिरीश : इतरांनाही बंदी नसते !

मंगेश : मुख्य म्हणजे गरज नसते !

मुकुट : उपयोगच नसतो काही !

गिरीश : हे असं कसं, ते तसं कसं -- हे विचारायचाच मला हल्ली कंटाळा येतो कधीकधी -- पण, तुम्ही दोघंही मरून पुन्हा आलाय काय ? मंगेश ?

मंगेश : मला बघितल्या बघितल्या तू टणुकमाठ म्हणालास ! तुला मुकुटराव म्हणायचं होतं !

गिरीश : ओके ! अरे पाहताक्षणीच मला व्यक्तिमत्वच जाणवलं ना ! माझ्या तोंडून ' मंगेश ' असं आलंच नाही ! ते असो ! आता, कंटाळा सोडून एक विचारतोच, बाकीचं एक वेळ ॲक्सेपटेड, चल ! पण मंगेशमध्ये मुकुट कसा ? कसा काय ?

मंगेश : सिंपल ! पण, त्याआधी तू हे सांग की तुला मी टणुकमाठ म्हणून कसा काय जाणवलो ?

गिरीश : माझ्या वयामुळं आणि अजून मी मेलो नसल्यामुळं, माझ्यात, दुसऱ्या माणसांची सरमिसळ होत असावी असं नको समजूस ! पर्सनॅलिटी जाणवतेच रे ! तुझ्यातून मला मंगेशच जाणवला असता तर मी नुसतंच ' माठ ' नसतं का म्हटलं ?

मुकुट : मी आधीचा जिवंत असताना तुझी हिंमत नव्हती ! अजूनही राहतोयस कुठं हे लक्षात ठेव ! फ्लॅट तोच आहे !

गिरीश : देवाणघेवाण, प्रभाव, उपकार, उपयोग -- हे सगळं गौणच होतं ना आपल्यात ! मित्र होतो आपण !

मंगेश : तुमची भांडणं जेवढी लांबतील तेवढं तिचं येणं लांबेल ! आणि मी उतावीळ आहे !

मुकुट : खरंच गौण होतं का सगळं ? का डावपेच होते तेही ? ( मंगेशला -- ) आणि तुम्ही कशाला उतावीळ होताय ? आता माझी बॅटिंग आहे !

गिरीश : मी नाही उत्तर देत ! तूच ठरव ! ( मंगेशला -- ) आणि टणुकमाठा, मंगेश कसा गेला, कधी गेला, त्याबद्दल मला काय काय वाटलं, ते सगळे प्रसंग कसे कसे घडले -- याबद्दल तुला एवढ्या वेळात काहीच उत्सुकता वाटली नाही ? माझ्या मित्राची ही किंमत तुझ्या लेखी ? ( मुकुटला -- ) तू त्याचाच आत्मा आहेस हे माहीत असून, तुलाही ?

मुकुट : गोंधळ होतोय !

मंगेश : गोंधळ होतोय !

गिरीश : सार्त्रनं अंधश्रध्दा जोपासल्या आणि पसरवल्या ! मृतात्म्यांचं जग, देवांचं राज्य, त्यांचा राजा !

मुकुट : तू अजूनही जिवंत आहेस !

मंगेश : तुम्ही अजूनही जिवंत आहात !

गिरीश : मला सगळं चालतंय ! मी मान्यच केलंय ! उलटं ! मला काही फरक पडत नाही ! थोड्याच वेळात मी, ती सवय म्हणून आत्मसात करीन ! हा मंगेश आणि तो मुकुट ! ओके ! आणि हा मी ! अजून न मेलेला !

मुकुट : दारू काढ च्यूत्या, प्यायच्या आधी नको सत्याला सामोरा जाऊस !

मंगेश : तो बहुधा अस्वस्थ असावा !

मुकुट : अस्वस्थ नसलेला -- असा माणूस -- असू शकतो ? ( गिरीश दारू, ग्लासेस इत्यादी आणतो, भरतो. तिघेही आपापले ग्लासेस घेतात. )

मुकुट : ( गिरीशला -- ) समज तुला दुसरा कुणीतरी व्हायचं झालं तर तू कोण होशील ?

गिरीश : अमिताभ बच्चन !

मुकुट : म्हणजे प्रसिध्दी आणि पैशासाठी ?

गिरीश : अर्थात ! खोटेपणा हे मूल्य म्हणून स्वीकारायला आता माझी तयारी झालीय !

मुकुट : प्रबोधनात्मक नको बोलूस !

गिरीश : ( मंगेशला -- ) पण तुम्हाला कसं माहीत माझं ब्रेकिंग न्यूजचं व्यसन ?

मंगेश : सिंपल ! तुम्हाला एकदम अपरिचित वाटू नये म्हणून मंगेशनं सांगून ठेवली होती तुमची काही माहिती ! आणि बरोबर आहे – प्रबोधन नकोच ! जगणं वेगळंच असतं ! ( बेल वाजते. ) प्रियदर्शिनीच ! लेट हर कम !

गिरीश : आपल्याला न्यूनगंड वाटला की इंग्लिशमध्ये बोलायचं असं नको करूस ! आपलं, नका करू ! ( मोठ्यांदा -- ) या, दार उघडंच आहे ! ( प्रियदर्शिनी येते. )

प्रिय : माफ करा, मीच विनंती केली होती की मंगेशबरोबर एकत्र यावंसं वाटतंच आहे तर अगदीच प्रतारणेचं गिल्ट नको, म्हणून, त्यानं मुकुटच्या रूपात मला भेटावं ! ते मान्य झालं ! त्यासाठी, त्यांना मग मुकुटलाही पुन्हा एकदा जगायची संधी द्यावी लागली ! केलं पण तेवढं त्यांनी !

मंगेश : मला कंपल्सरी संधी ! मंगेशच्या रूपात !

गिरीश : अच्छा ! असं आहे तर ! पण मग मी तरी मूळचाच आहे की पुन्हा एकदा संधी मिळून आलोय ? काहीही असो, मला काहीच फरक पडत नाही ! ओके ! ' मंगेश ' या विषयाचं माझ्या आयुष्यातून मी आता उच्चाटनच करत आहे !

प्रिय : का ? का ?

गिरीश : तो आता मुकुट आहे ना ! म्हणून !

प्रिय : पण, मुकुट या रूपात मंगेश आहेच ना ?! माझ्या विनंतीमुळं हेच -- ठरलेलंच आहे !

गिरीश : नाऊ आय ॲम लीस्ट बॉदर्ड !

मंगेश : आता तुम्ही का बोलताय इंग्लिशमध्ये ?

गिरीश ( प्रिय.ला -- ) तू स्त्री आहेस की पुरुष ?

प्रिय : हा कसला प्रश्न ? सगळंच विस्कटलं तर स्मरणशक्तीचा उपयोगच बंद होईल ! आणि मी स्त्री आहे की पुरुष याच्यात तुम्ही नका इंटरेस्ट घेऊ ! तो मंगेशचा अधिकार आहे ! अर्थात प्रेमाचा !

गिरीश : असं काय !

मंगेश : प्रतारणेचं गिल्ट टाळण्यासाठी ही आत्मवंचनेचा गुन्हा करतेय आणि शिवाय विश्वासघाताचा ! दोन्हींची दु:खं भोगेल ती !

प्रिय : एक आयुष्य मी पूर्णपणे समर्पित केलं ना तुम्हाला ? हे आता दुसरं आहे !

मंगेश : तरीही गिल्ट टाळावंसं वाटलंच !

गिरीश : तेवढं तर होणारच मंगेश !

मंगेश : आँ ?

गिरीश : नव्हे, आपलं, मुकुट ! अहो, गुंतागुंत खूप वाढायला लागली की, अमुक एक असं असावं असं म्हणायची शक्तीच हळूहळू कमी होत जाते ! तुमचंही तसं होईलच ! बरं का मुकुट, डोंट वरी ! इट इज जस्ट अ मॅटर ऑफ टाईम.!

मुकुट : आता पुन्हा तोच प्रश्न येणार ! मी वयस्कर आणि तू तरुण ! लोकांच्या नजरेनं !

प्रिय : आता नाही येणार तो प्रश्न ! आपण तेच आहोत असं लोक धरून चालणार ! तो सगळा विषय एकदा होऊन गेलेला आहे ! गिल्ट टाळण्याच्या माझ्या प्रयत्नाचा हा एक फायदाच आहे !

मंगेश : पण हिचा जिवंतपणा पुन्हा सुरू झाल्यामुळं आता पहिलीही जिवंत असणार आहे ! कारण, ही गेल्यावर मग ती जाणार असं आहे !

गिरीश : माझं बरं आहे ! प्रेम करण्यात काही तथ्यच नाही हे मला उपजतच ज्ञान आहे ! आणि दुसरं म्हणजे --

मुकुट : केशवसुत !

गिरीश : नाही, नाही, त्यांना मी कधीच सोडून दिलं !

मुकुट : मग आता काय ?

गिरीश : कुसुमाग्रज ! किंवा गोविंदाग्रज !

मंगेश : मराठीतले कवी स्वत:च्या नावाबद्दल फार कॉन्शस असायचे बाबा ! आपल्या बरोबर घरच्या आणखी कुणालातरी प्रसिध्द् करणं आवडायचं त्यांना !

मुकुट : किंवा प्रेमामुळं घेत असतील ते अशी नावं !

गिरीश : असं असेल तर मला तर ते फारच मिळमिळीत, बुळबुळीत, गिळगिळीत आणि क्षुद्र वाटतं !

मंगेश : जळजळीत वाटलं पाहिजे ! परिवर्तन करायचं असेल तर तेच उपयोगी पडतं ! जळजळीत !

गिरीश : जाऊं दे ! मरो ते !

मुकुट : आणि पुन्हा जिवंत होऊन येवो !

गिरीश : आणि जे कोण असेल ते ’ मेले ’ ऐवजी ’ मेले नाहीत ’ अशी त्याच क्षणापासून पुन्हा सुरुवात होत असल्यानं एकदा मेले होते यालाही काही अर्थ राहात नाही !

प्रिय.: पण पुन्हा एकदा संधी मिळालेली असल्यानं आता जरा जास्त कटाक्षानं, बारकाईनं आणि काळजीपूर्वक जगता येऊ शकतं ना !

गिरीश : ’ शकावं ’ -- हे ठीक आहे ।

मुकुट : भाषेतली हुशारी न दाखवता जग की आता तरी !

गिरीश : ( प्रिय.ला --) आणखी कुणी भेटलं का तिकडे ?

प्रिय. : हो ! ती एक मस्त स्टोरी आहे !

गिरीश : ब्रेकिंग न्यूज ?

प्रिय. : हं , तसंच ! तर पूर्वी एक सिनेमा येऊन गेला बघा -- ’ अ मॅन फ़ॉर ऑल सीझन्स ’ या नावाचा , पाहिला होता तुम्ही ?

मुकुट : इंग्लिश होता नं -- मग नाही !

प्रिय. : तर त्यातला हीरो -- थॉमस मूरच भेटला ! म्हटलं , पिक्चर खरंच भारी होतं तुमचं ! तर तो नुसतं

' ठीक आहे ' म्हणाला ! म्हटलं, मेल्यामुळं मूड नसेल , जाऊं दे ! तरीही, त्याला जरा उत्तेजना देण्यासाठी मी पुढे बोलत राहिले -- म्हटलं, तुमच्यावरच्या खटल्याचा सीन तर काय जबरस्तच होता ! ( इथल्यांना --) आता काय असतं ते तुम्हाला थोडक्यात सांगते. राजाचं काहीतरी एका स्त्रीशी लफडं असतं आणि त्यांच्या लग्नाला धर्मगुरूची मान्यता नसते ! तर राजाची आयडिया अशी असते की आपला मित्र थॉमस मूर त्या धर्मगुरूच्या पदाला योग्य आहे, आपण त्याला त्या पदावर आणू आणि त्याचाकडून मान्यता घेऊ ! तो जंग जंग पछाडतो पण हा म्हणजे मूर काही दाद देत नाही ! त्यामुळे पुढे त्याच्यावर राजद्रोहाचा खटला होतो ! असो ! तर सरकारी वकील म्हणतो, ( त्या आविर्भावात --) '' राजेसाहेबांनी तुमच्याकडे अनेकदा काही इच्छा व्यक्त केली तर प्रत्येक वेळी तुम्ही गप्प बसलात, म्हणजेच नकार दिलात ! हा राजद्रोह का समजू नये ? '' तर यावर मूर उत्तर देतो -- '' ' मूकसंमती ' मी ऐकली आहे पण मूक राहाणं याचा अर्थ नकार असा कसा होतो ? '' यावर तो वकील म्हणतो, '' म्हणजे लोकांनी काय समजावं, तुमची संमती होती ? '' यावर मूर म्हणतो, '' लोकांनी याचा अर्थ लावण्यासाठी त्यांचं शहाणपण वापरावं पण न्यायालयानं मात्र कायद्याच्या आधारानंच अर्थ लावावा ! '' इथे लोकांचा हशा येतो, वगैरे. मी म्हटलं, माझ्या अजून लक्षात आहे ! शेवटी, शिरच्छेदाच्या दृश्याच्या वेळीही, येशू ख्रिस्ताप्रमाणे मूर, संबंधित मारेकऱ्याला, त्याला त्यानं क्षमा केल्याचं सांगतो ! शिरच्छेदासाठी पातं खाली येतं आणि झपकन् सिनेमा संपतो ! मी खरं म्हणजे भारून गेले होते ! पण तो काय म्हणाला, म्हणे, '' ते सगळं ठीक आहे -- तत्त्वशीलपणा आणि हीरोगिरी ! पण एकूणात मी माझ्या हुशारीच्या अभिमानाला बळी पडलो ! मी एवढं हुशार होत बसायची काही गरज नव्हती ! '' मी फिक्सच होऊन बसलो, म्हणाला, माझ्या हुशार असण्यात !

गिरीश : त्यात काय विशेष ? सगळ्यांचं असंच असतं -- हुशारीच असं नव्हे -- काहीही ! -- काहीही वागायला कुठलातरी पाया लागणारच आणि त्या पायाला काहीतरी कारणं असणारच, मग ती जनुकनकाशाची का असेनात ! -- मला तर -- जाऊं दे -- मेल्यावर माणसाला जे आहे तेच काहीतरी वेगळं दिसत असेल !

मुकुट : (प्रिय.ला -- ) जाऊं दे ! काही कळत नाही ! याच्या दारूत भेसळ असावी ! चढतच नाहीय ! आपण जरा बाहेर जाऊन येऊ ! मला काही बोलायचंय तुझ्याशी !

मंगेश : अहो, तिच्या सहवासाच्या दारूसाठी आसुसलाय तो ! दुसरं काय !

गिरीश : आता योजनाच तशी आहे तर काय करणार !

प्रिय.: हं, चला, माझ्याही मनात तेच येतंय !

गिरीश : या प्रेमाच्या दारूला मात्र मी मुकलो ! उपजत ज्ञानच -- ' यात काही तथ्य नाही ! '

प्रिय.: आलोच हं आम्ही -- ( प्रिय.आणि मुकुट एकमेकांना बिलगून जातात. )

मंगेश : साली ! काय हरामी जात असते हो !

गिरीश : एक होऊया आपण, आपली सगळी मतं जुळतील ! आपले प्रश्न सामाजिक नसले तरी किंवा व्यक्तिगणिक वेगळे असले तरी एकत्र राहू या का आपण ?

मंगेश : पण तुम्ही मला --

गिरीश : मुकुट म्हणणार ! -- आणि आता आपल्या आपल्यात अहोजाहो बंद ! पण तरीही, पहिल्या बायकोचं काय करणार ? ती जिवंतच आहे ना ? !

मंगेश : मला भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्यावर आधी नीट पकड येऊ दे !

गिरीश : डोंट वरी ! मी आहे तुझ्याबरोबर !

मंगेश : मधूनमधून, वारंवार आणि तासंतास येत जाईन मी इकडे गप्पा मारायला ! काही अडचण येणार नाही ! हे अर्थात, तिनं मला मुकुट म्हणून नीट स्वीकारल्यावर, कारण मला जबाबदारी कुठलीच टाळायची नाही ! मी एक नीतिमान माणूस आहे ! प्रियदर्शनीनं तिची सोय पाहिलीय, त्यामुळं, तिला मंगेश मुकुटच्या रूपात मिळालाय पण त्याच कारणानं माझ्या एकनिष्ठ बायकोला मला मंगेशच्या रूपात स्वीकारावं लागणार आहे -- तिला नक्कीच हा प्रॉब्लेम होणार आहे ! म्हणूनच तिनं मला स्वीकारेपर्यंत मी काहीही बोलू शकत नाही ! तिनं मला मुकुट म्हणून पूर्णपणे स्वीकारणं -- मी ' पूर्णपणे ' म्हणतोय -- लक्षात घे ! -- आणि या प्रियदर्शिनीच्या हरामीपणातून मला मनानं बाहेर पडता येणं -- एवढं झालं की फ्रीली, आनंदात आपल्याला भेटता येईल ! -- गप्पा मारता येतील !

गिरीश : मुकुट, मंगेशच्या रूपात तू बोलतोयस हे मला माहीत आहे म्हणून -- हे मंगेश स्वत: बोलला असता तर शिव्याच घातल्या असत्या मी त्याला !

मंगेश : तो बोललाच नसता नं पण ! आता, तो भडवा, संधीचा फायदा घेणारच !

गिरीश : आणि विशेष म्हणजे माझी मैत्रीही गेली ढगात -- त्याच्या दृष्टीनं ! धिस इज पेनफुल !

मंगेश : त्यानं तुला दु:ख दिलंय, तिनं मला ! खरं तर त्या दोघांनीही, आपल्याला दोघांनाही !

गिरीश : लिमिटलेस ! धिस इज टू मच !

मंगेश : इंग्लिश पण बरं आहे तुझं !

गिरीश : इंग्लिशमधलं फारसं वाचन नसलं तरीही, हं !

मंगेश : यस ! कमेंडेबल !

गिरीश : ' कमेंडेबल ' हा शब्द इथं करेक्ट आहे का हे नक्की माहीत नसलं तर साधं ' ॲप्रिसिएबल ' म्हण !

मंगेश : नाही, ' कमेंडेबल ' ही बरोबर आहे ! बहुतेक !

गिरीश : ' बहुतेक ' कशाला म्हणतोस ? मी ते चॅलेंज करू शकत नाहीय, हे कळलेलं नाहीय का तुला ?

मंगेश : मैत्रीच्या सुरुवातीलाच मी तुझ्या अज्ञानाचा फायदा घेणं योग्य होणार नाही !

गिरीश : कारण तू एक नीतिमान माणूस आहेस !

मंगेश : प्रश्नच नाही !

गिरीश : आणि तुझी पहिली बायको ? ती कशी होती ?

मंगेश : मी तिला दगा कुठे दिला होता ? मी तर दोघींनाही सांभाळायला तयार होतो !

गिरीश : त्यामुळं, यस, तुझं म्हणणं बरोबर आहे ! हा दुसरीनं केलेला विश्वासघातच आहे ! मेल्यानंतर का असेना !

मंगेश : खरं म्हणजे आता हे मला कळायचाही प्रश्न नव्हता पण तिच्या मनातल्या अपराधी भावामुळंच आता मला यातून जाणं भाग आलं आहे !

गिरीश : हे तर आणखीनच वाईट झालं आहे ! तू मेलेलाच राहिला असतास तर हे दु:ख भोगण्याचा तुला प्रश्नच नसता आला !

मंगेश : जणू मला दु:ख दिल्याशिवाय तिचं नवं प्रेम साजरंच होऊ शकलं नसतं !

गिरीश : आता याच्यावर तू जेवढं जास्त बोलशील तेवढं अधिकच वाईट बाहेर येत राहील यातून ! त्यापेक्षा शांत राहा आणि तुझ्या जुन्या संसारात रमून जा !

मंगेश : -- पराभूत मनानं !

गिरीश : असं नाही माझं म्हणणं !

मंगेश : पण तोच ना अर्थ त्याचा ! ( क्षणभराने -- ) माझ्या मनात सूडाची भावना येतेच आहे ! मी कबूलच

करतो !

गिरीश : मुकुट ! ( शांतता. ) बरोबर आहे तुझं -- लोकांना तर ती, तुझी दुसरी, तुझ्याशीच एकनिष्ठ आहे असंच दिसत राहणार आहे !

मंगेश : पण सत्य मला जाळत राहील !

गिरीश : ते आहे ! पण करणार काय ?

मंगेश : या सगळ्याचा परिणाम म्हणून घडेलच काही ना नाही -- आपोआप !

गिरीश : तुझ्या या मनस्थितीबद्दल मला सहानुभूती वाटते हे मी तुला सांगू इच्छितो ! थोड्या फरकानं मीही अपमानित झालोच आहे -- मंगेशकडून ! त्याच्या आयुष्यात पुन्हा प्रेम येतंय म्हटल्यावर तो लगेच मला दु:ख द्यायला तयार झाला ! त्याचा तसा हेतू नसेल फार तर ! पण झालं तेच !

मंगेश : जाऊं दे, चल , भर आपले पेग ! ( गिरीश तसे करतो. ) त्यांच्या या वागण्याच्या परिणामांमधून आपल्याला बाहेर राहता यायला हवं होतं !

गिरीश : ते कधीच, कुठंच शक्य होत नाही !

मंगेश : त्यामुळंच, काही ना काही प्रतिक्रिया घडणंच, कदाचित, अटळ आहे --

गिरीश : हं -- ( दोघेही पीत राहतात. ) एरवीही जगण्यात, कधीकधी, कुणाकुणाबद्दल असे विचार आपल्या मनात येऊन जातात, पण आपण तसं काही करत नाही --

मंगेश : म्हणजे ?

गिरीश : टोकाचे -- टोकाचे विचार ! -- असं करावं -- तसं करावं -- असे --

मंगेश : हं --

गिरीश : रागामुळं -- नाही, क्रोधामुळं --

मंगेश : हं -- ( क्षणभराने -- ) आत्ताही --

गिरीश : ( काही क्षणांनी -- ) ती दोघं परत येतील इथं, कदाचित् -- त्यांना हे काही जाणवू द्यायला नको --

मंगेश : ( जरा चिडून -- ) म्हणजे, लेट देम एंजॉय -- असं म्हणायचंय की काय तुला ?

गिरीश : तसं नाही, समजून घे -- मी तर तुझ्याच बाजूला आहे --

मंगेश : उलट माझं तर म्हणणं -- जाणवू द्यायचं ! -- मुद्दाम ! -- अवघड करायचं त्यांना -- हे असं एंजॉय करणं !

गिरीश : मला तर तशा, साध्या, कमी दर्जाच्याही, चार कविताही लिहिता आल्या नाहीत कधी -- हे एक वैफल्य आहेच -- आधीच -- त्यात हे -- ( बेल वाजते. )

गिरीश : या, या -- दार उघडंच आहे -- ( मुकुट आणि प्रिय. प्रवेश करतात. )

मुकुट : आता आम्ही मरेपर्यंत एकत्र राहू -- एकमेकांवर प्रेमाचा वर्षाव करत ! -- या जिवंतपणीही आम्ही एकमेकांच्या प्रेमाचा स्वीकार केला आहे ! मृतात्मे असताना केला होता तसाच !

गिरीश : मग काय, पेढेबिढे आणले की नाही ?

मुकुट : ( ग्लासांकडे बोट दाखवत -- ) जे चाललंय त्याच्याबरोबर पेढे नकोत म्हटलं -- उद्या पूर्ण पार्टीच करू -- आणि ही म्हणाली, दारूत भेसळबिसळ काही नाहीय --

प्रिय. : आपण चौघं ! तेही ठरवूनच आलोय आम्ही ! आणि आम्ही लग्नच करणार आहोत !

गिरीश : हा मंगेश मुकुटच्या रूपात आहे आणि त्या रूपात त्याला आधीच एक बायको आहे ! आणि इथे व्दिभार्या प्रतिबंधक कायदा आहे !

प्रिय. : अहो, इथल्या कायद्याप्रमाणे नाही काही करणार ! असंच ! आम्ही आता इथली बंधनं कशाला मानू ?

गिरीश : पूर्वीपासून पाहतोय हं मी तुमचा ब्रिलिअन्स ! तुमच्या टीव्हीवर मुलाखती व्हायच्या तेव्हापासून !

मुकुट : मीही पाह्यचो कौतुकानं -- आता ते सगळं मलाच प्राप्त झालंय !

मंगेश : ( राग दाबून -- ) यू आर लकी -- ( पण संताप बाहेर पडतोच -- ) भोसडीच्या !

गिरीश : अरे ! अरे ! ( मुकुट आणि प्रिय.ला -- ) ए, चला, कमॉन, जॉईन अस -- तुम्ही मधेच बाहेर गेलात -- हे पाहा -- तुमचेही भरतोय ग्लासेस -- ( तसे करतो. )

मुकुट : ते ठीक आहे -- पण यांना काय झालं एकदम ?

गिरीश : डोंट वरी ! कमॉन ! चला घ्या !

प्रिय.: ( मंगेशला -- ) मुकुट, हे आमचं दुसरं आयुष्य आहे -- तुम्ही आता निष्कारण पझेसिव्ह किंवा मत्सरी नका होऊ --

मंगेश : ( संतापून जाऊन तिचा गळा दाबत -- ) तू तुझं वागतेयस ना, मग मी माझं का नको वागू ? अं ? का नको ?

मुकुट : ( ते सोडवण्याचा प्रयत्न करत -- ) अरे, अरे, हे काय, आम्ही उगीचच इथं परत आलो -- अरे, सोडा, सोडा -- ( प्रिय. ही ओरडते. सुटायचा प्रयत्न करते. ) गिरीश, आपली जुनी मैत्री आठव -- गिरीश --

गिरीश : ( जणू तटस्थपणे -- ) तू विसर आणि मी आठवतो ! ( दारू पीत राहतो. त्या तिघांचा गोंधळ चालू – मुकुट शेवटी एक खुर्ची उचलून मंगेशच्या डोक्यात घालतो -- मंगेश हेलपाटतो -- पडतो -- प्रिय. धापा टाकत उभी -- )

प्रिय. : ( मंगेशला -- ) हे प्रेम तुझं -- आधीच्या आयुष्यातलं ! -- हे प्रेम -- ( एकदम, दानापूर रेल्वे स्टेशनवरची ती स्त्री अंगात संचारल्याप्रमाणे -- ) असेच असणार सगळे -- जसेच्या तसे -- असेच असणार -- ( हळूहळू नॉर्मल होते -- )

गिरीश : प्रियदर्शिनीताई, ज्याला त्याला आपलंआपलं जगायचंच आहे ! -- अं ? ( ती गोंधळून पाहतेय. मंगेश उठण्याच्या प्रयत्नात. मुकुट प्रिय.च्या केसांवरून, पाठीवरून हात फिरवत, तिची काळजी घेत उभा. ) अरे, दारू नकोय का कुणाला ? ( स्वत:चा ग्लास घटाघट पिऊन आपटत ठेवतो. मंगेशला उठणे जमत नाही. तो पडतो. निपचित. गिरीश पाहतो. मग स्वत:चा मोबाईल इकडेतिकडे शोधतो. तो टीपॉयखाली पडलेला सापडतो. तो घेऊन गिरीश दोन क्षण विचारमग्न. मग -- ) आधी पोलीसांना फोन करावा की डॉक्टरला ? ...

मुकुट : अरे काय करतोयस -- ( गिरीश त्याला हाताने खूण करून थांबवतो. )

गिरीश : ( स्वगत -- ) मुकुटला वाचवायला महत्त्व द्यायचं असेल तर डॉक्टर आणि मंगेशचा सूड घेणं महत्त्वाचं असेल तर पोलीस... ( दोन क्षणांनी नंबर फिरवतो. क्षणभराने -- ) हॅलो, पोलीस स्टेशन ? हं, ऐका -- इथं एक हाफ मर्डर झालाय -- हं, पत्ता लिहून घ्या ... गिरीश ... अहो, शिरीष नाही, गिरीश -- गिरीश -- गिरीश -- जी फॉर गांधी ... हं ...

( पडदा पडत जातो ... )

-- oo --

**सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

चं.प्र.देशपांडे, ३, स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर, सहकारनगर नं. २, पुणे - ४११००९.

फोन -- ९३७१००५७७३.

ईमेल – champrade@gmail.com

वेबसाईट – www.champralekhan.com